**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.धनंजय भगवानदास देवी
प्लॉट नं.२३, ओंकार, रांगोळे कॉलनी, गेंडामाळ, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसचिव (उच्च शिक्षण),
रयत शिक्षण संस्था, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील,
अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३११० / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसचिव (उच्च शिक्षण),
रयत शिक्षण संस्था, सातारा प्रि.डॉ.एन.एस.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील,
अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन, सातारा श्री.डी.एस.सूर्यवंशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

प्रभारी प्राचार्य श्री.बी.बी.गोडबोले यांच्याबद्दलची अनियमितता, गैरकारभार, नियमबाह्य नेमणुका, तक्रारींची चौकशी याबाबतची दि.१ जानेवारी १९८७ पासूनची माहिती अपीलकर्ता श्री.धनंजय भगवानदास देवी यानी मागितली होती.

आयोगाने पाठविलेल्या सुनावणीसूचनेबरोबर मूळ माहितीच्या अर्जाची प्रत व तारीख नसल्याने म्हणणे मांडणे अशक्य आहे. मूळ माहितीच्या अर्जाची प्रत व तारीख कळविल्यास अपिलामध्ये लेखी म्हणणे मांडता येईल, असे अपीलकर्ता यानी दि.१३.६.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यानी माहिती देण्याचे मान्य करूनही योग्य माहिती दिली नाही. भ्रष्टाचार निर्मूलनासाठी ही माहिती आवश्यक असतानाही नाकारली जाते, असे श्री.देवी यानी दि.२८.६.२०११ च्या निवेदनामध्ये म्हटले असून सर्व संबंधितांपासून आपले जिवित व करिअर याना संरक्षण देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी याना द्यावेत, अशी मागणीही त्यानी केली आहे.

अपीलकर्त्यांचे अनेक अर्ज असून वेळोवेळी त्याना माहिती दिली आहे. दिलेल्या माहितीतून अधिक मुद्दयांचे स्पष्टीकरण, खुलासा वा माहिती मागणारे अर्ज ते करतात. आपल्या जिविताला धोका असल्याचे प्रत्येक अर्जात व अपिलात ते नमूद करतात. त्याना कोणतीही माहिती नाकारलेली नाही मात्र भाष्य करून स्पष्टीकरणात्मक स्वरूपाच्या अनेक मुद्दयांची विचारणा ते करतात. अशा प्रकारची उत्तरे देणे शक्य होत नाही. कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करून देता येतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील, अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन, सातारा श्री.डी.एस.सूर्यवंशी व अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव (उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था, सातारा प्रि.डॉ.एन.एस.गायकवाड यानी केले. कर्मवीर भाऊराव पाटील, अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन, सातारा हे विनाअनुदानित असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ त्याला लागू होत नाही. तरीही माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केले.

वरील बाबी लक्षात घेता अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील, अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन, सातारा यानी माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र भाष्य करून त्या अनुषंगाने खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच संबंधित महाविद्यालय विनाअनुदानित असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होणार नाही. तरीही एका ख्यातनाम शिक्षण संस्थेचे हे महाविद्यालय असून संस्थेने अपीलकर्त्यास आवश्यक असणारे अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देणे व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची लेखी मागणी करून अपीलकर्त्यांनी योग्य ते शुल्क भरून या प्रती प्राप्त करून घेणे, अशी कार्यपध्दती उभय बाजूंनी अवलंबिणे आवश्यक आहे. अपीलकर्त्यांच्या अर्जांचे व अपिलांचे प्रमाण लक्षात घेता ते अत्यंत गरजेचे आहे, याची समज उभय बाजूंना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तम ज्ञानू सावंत
प्लॉट नं.पी ९१, नवीन एम.आय.डी.सी., ता.जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक
विकास महामंडळ, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, महाराष्ट्र औद्योगिक
विकास महामंडळ, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२६७ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातारा श्री.कालीदास शिवमूर्ती भांडेकर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातारा श्री.सोमेश्वर धोंडू सोनवणे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# <u>विवेचन</u>

सातार्‍याच्या औद्योगिक वसाहतीत असलेल्या बोअरवेल व विहिरी यांचे सर्वेक्षण करून माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.उत्तम ज्ञानू सावंत यानी केली होती. वसाहतीत ७०० भूखंड असून अशा प्रकारचे सर्वेक्षण करून माहिती देणे कठीण आहे. उपलब्ध माहिती अपीलकर्त्यांना दिली. बोअरवेलसाठी संबंधितांनी परवानगी घेणे आवश्यक असते. परंतु मुळात जेथे पुरेसे पाणी उपलब्ध आहे तेथे अशी परवानगी दिली जात नाही. अपीलकर्त्यांना बोअरवेलसाठी परवानगी दिली नाही, म्हणून माहितीच्या अधिकारात अशा प्रकारची मागणी ते करीत आहेत, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातारा श्री.सोमेश्वर धोंडू सोनवणे यानी केले.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र औद्योगिक वसाहतीत नियमबाह्य बोअरवेल / विहिरी असल्यास ते स्पष्ट होणे व्यापक सार्वजनिक संदर्भात व कारभारातील पारदर्शकतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून त्याबाबतची माहिती संकलित करून उपलब्ध ठेवली गेली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) सातारा येथील औद्योगिक वसाहतीतील बोअरवेल / विहिरी याबाबतच्या भूखंडनिहाय वस्तुस्थितीचा तपशील जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सातारा यानी दि.२५.८.२०११ पर्यंत अपीलकर्त्यास उपलब्ध करून द्यावा. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ४ अन्वये हा तपशील सर्व नागरिकांसाठीही जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी स्वयंस्फूर्तीने उपलब्ध ठेवावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. झेड. एम. हुंडेकरी
प्लॉट नं. १७/६९, शास्त्रीनगर, सोलापूर - ४१३ ००३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर,
शासकीय विश्रामगृह आवारात, पंढरपूर ४१३३०४

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर,
शासकीय विश्रामगृह आवारात, पंढरपूर ४१३३०४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२३२/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. झेड. एम. हुंडेकरी
प्लॉट नं. १७/६९, शास्त्रीनगर, सोलापूर - ४१३ ००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर,
शासकीय विश्रामगृह आवारात, पंढरपूर श्री. पी. एस. औटी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर,

| | |
|---|---|
| | शासकीय विश्रामगृह आवारात, पंढरपूर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सांगोला तालुक्यातील रस्त्यांबाबतची सन २००९ ते २०१० मधील माहिती मागितली होती. शुल्क भरुनही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपुरी माहिती दिली. वेळेत माहिती दिली नसल्यामुळे माहिती निःशुल्क देण्याचे व शुल्क परत करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क परत केले.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यास विहित मुदतीत शुल्क कळविले. सरसकट स्वरुपाची व ढोबळ मानाने माहिती त्यानी मागितली होती. त्यानी शुल्क भरले त्याच दरम्यान मी अपघातात गंभीर जखमी झाल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. दिलेली माहिती पूर्ण व बरोबर आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता कागदपत्रात नमूद केल्यानुसार कामे झाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी केली. परंतु ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची बाब नाही. कारणे, खुलासा, स्पष्टीकरण अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती म्हणून करता येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांची लेखी मागणी करुन त्या प्रती सशुल्क प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंतराव कृष्णा बोडरे
मु.पो.अहिरे, ता.खंडाळा, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक(वर्ग-१) तथा
मुद्रांक जिल्हाधिकारी, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, खंडाळा,
ता.खंडाळा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२६३ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंतराव कृष्णा बोडरे
मु.पो.अहिरे, ता.खंडाळा, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक(वर्ग-१) तथा
मुद्रांक जिल्हाधिकारी, सातारा श्री.जी.डी.कराड

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, खंडाळा,
ता.खंडाळा, जि.सातारा श्री.एच.एम.जमदाडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मौजे अहिरे व मौजे धावडवाडी येथील तीन गट क्रमांकाची खरेदी-विक्री झ ाली असल्यास त्याबाबतच्या दस्तऐवजाच्या प्रती मागितल्या होत्या. माहितीच्या अधिकारात रूपये २ प्रतिपृष्ठ प्रमाणे शुल्क आकारणे आवश्यक असताना नोंदणी अधिनियम १९०८ मधील तरतुदीनुसार प्रतिवर्ष रूपये २५ प्रमाणे शोध शुल्क भरून प्रती घेण्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी कळविले आहे.

जन माहिती अधिकारी : नोंदणी अधिनियम १९०८ च्या कलम ५७ नुसार प्रतिवर्ष रूपये २५ प्रमाणे शोध शुल्क आकारून दस्तऐवजाच्या प्रती देण्याची तरतूद आहे. अशा प्रकारे पूर्वनिर्धारित असलेले शुल्क शासनाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या नियमावलीत आकारण्यास मान्यता दिली आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली शुल्क आकारणी नियमानुसार योग्य आहे. अपीलकर्त्यास संबंधित दस्तऐवजाच्या प्रती आवश्यक असल्यास त्यानुसार शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २६ जुलै २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गुरुराज दिलीप पोरे
९/२, नीलनगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३ ००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उद्यान अधीक्षक,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९२४/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गुरुराज दिलीप पोरे
९/२, नीलनगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३ ००२

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. अनिल सदानंद विपत

**जन माहिती अधिकारी** तथा उद्यान अधीक्षक,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर डॉ. सुहास म. लांडगे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील किंग कोब्राच्या मृत्यूच्या संदर्भातील माहिती दोन अर्जांद्वारे मागितली होती. दि. १७/६/२०१० च्या अर्जातील मुद्दा क्र. ६ ची माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - उद्यान विभागाकडून माहिती अपीलकर्त्यास दिली. अन्य माहिती किंग कोब्राची सर्व जबाबदारी ज्यांच्यावर सोपविण्यात आली आहे त्या 'नेचर कॉन्झर्वेशन सर्कल' कार्यालयाकडील असून अपीलकर्त्याला अपेक्षित असलेल्या स्वरुपाचे अभिलेख महानगरपालिके-कडे ठेवले जात नाहीत. किंग कोब्राच्या संबंधित प्रकरणाबाबत न्यायालयात याचिका दाखल आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी दोन अर्जांमधील माहितीबाबत एकत्रित स्वरुपाचे अपील करणे योग्य नाही. तसेच अभिप्राय, अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही. तथापि अपीलकर्त्यांची मागणी वन्य जीव रक्षणाच्या दृष्टीने महत्वाची आहे, हे लक्षात घेता अपीलकर्त्यांच्या दि. १७/६/२०१० च्या अर्जातील मुद्दा क्र. ६ बाबतची माहिती जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास ८ दिवसांत द्यावी. संबंधित माहिती देण्यास न्यायालयाने मनाई केलेली नसल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे कारण माहिती नाकारण्यासाठी देता येणार नाही, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार माहिती देण्याबाबत श्री. भरत छेडा, नेचर कॉन्झर्वेशन सर्कल, सोलापूर याना जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर डॉ. सुहास म. लांडगे यानी दि. १२/५/२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. तथापि माहिती अद्याप न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि. २६/५/२०११ च्या पत्रान्वये केली. संबंधित प्रकरणातील मूळ अधिपत्य सोलापूर महानगरपालिकेचे आहे, हे लक्षात घेता नेचर कॉन्झर्वेशन सर्कल, सोलापूर यांच्याकडून

सार्वजनिकरीत्या उपलब्ध असणे आवश्यक असलेली माहिती प्राप्त होत नसल्यास आयुक्त, महानगरपालिका, सोलापूर यानी संबंधितांविरुध्द प्रशासकीय कारवाई केली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (४) अन्वये महानगरपालिकेने सर्व नागरिकांसाठी उपलब्ध ठेवणे बंधनकारक आहे. तथापि महानगरपालिकेने किंग कोब्राची जबाबदारी सोपविलेली 'नेचर कॉन्झर्वेशन सर्कल' ही संस्था तशी माहिती उपलब्ध करुन देत नसल्यास आयुक्त, महानगरपालिका, सोलापूर यानी योग्य ती प्रशासकीय कारवाई करुन अनुपालन अहवाल आयोगास दि. २०/८/२०११ पर्यंत सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी -
१. आयुक्त, महानगरपालिका, सोलापूर

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संचल कदम
सर्व्हे नं.१२अ, लक्ष्मीनगर, संत रोहिदास पथ, येरवडा, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (भवन),
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यक्रम अधिकारी, नागरवस्ती विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२१९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संचल कदम
सर्व्हे नं.१२अ, लख्मीनगर, संत रोहिदास पथ, येरवडा, पुणे-४११००६

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (भवन), पुणे महानगरपालिका, पुणे
विद्यमान-श्री.मदन रामचंद्र आढारी, तत्कालीन-श्री.संदीप गोपाळ खांडवे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा कार्यक्रम अधिकारी, नागरवस्ती विकास योजना,<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.हनुमंत नाझीरकर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : येरवडा, पुणे येथील झोपडपट्टीत बांधलेले सांस्कृतिक सभागृह व त्यालगतची वास्तू महानगरपालिकेने अन्य संस्थेला देण्याबाबतची माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली नाही व 'येरवडेश्वर चॅरिटेबल फाऊंडेशन' या ट्रस्टकडून माहिती घ्यावी, असे कळविले. ट्रस्टकडून माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी : माहिती दोन विभागाशी संबंधित होती. भवन विभागाकडील माहिती दिली. भूमी जिंदगी व गलिच्छ वस्ती निर्मूलन यांना माहिती देण्यासाठी पत्र दिले. ट्रस्टने माहिती दिली नाही.

अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती सार्वजनिक न्यासाकडील (ट्रस्टकडील) असली व संबंधित न्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण'ठरत नसल्याचे गृहित धरले, तरी अपीलकर्त्यांचा विषय सार्वजनिक हिताशी संबंधित व महानगरपालिकेने निर्माण केलेल्या सुविधेच्या संदर्भातील आहे. संबंधित ट्रस्ट अशी माहिती उपलब्ध करून देत नसल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २(जे) अन्वये प्रशासकीय अधिकारात ट्रस्टकडून ही माहिती प्राप्त करून घेऊन जन माहिती अधिकाऱ्यानी पुरविली पाहिजे. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यक्रम अधिकारी, नागरवस्ती विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे यानी कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित संस्थेला कळवून जन माहिती अधिकारी यानी माहिती प्राप्त करून दिली.

दि.१३.७.२०१० रोजी आवश्यक कागदपत्रांच्या प्रती मिळाल्याची अपीलकर्त्याची स्वाक्षरीसह पोहोच जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (भवन), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रविंद्र घोरपडे यानी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.इब्राहिम इस्माईल तडकल
६५२, साखर पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिध्देश्वर पेठ, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक सहकारी संस्था,
सोलापूर शहर, रेल्वेलाईन, नवल पेट्रोलपंपाजवळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९९ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.इब्राहिम इस्माईल तडकल
६५२, साखर पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सिध्देश्वर पेठ, सोलापूर प्रतिनिधी श्री.बी.एस.कटकदौंड

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर शहर, रेल्वेलाईन, नवल पेट्रोलपंपाजवळ, सोलापूर श्री.संजय एस.राऊत | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सोलापूर महानगरपालिका सेवा सहकारी पतसंस्थेमधील भ्रष्टाचाराच्या चौकशीची मागणी केली हेती. त्यावरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपुरी दिली. संस्थेच्या संचालकांच्या बंधपत्राची प्रत दिली नाही.

जन माहिती अधिकारी : बंधपत्रे संस्थेने ठेवून घ्यावयाची असून आमच्या कार्यालयाला फक्त कळवावयाचे असते. माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे अर्ज वर्ग करून अपीलकर्त्यास तसे कळविले होते. परंतु सहकारी पतसंस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे संस्थेने कळविले. कार्यालयाकडील माहिती अपीलकर्त्यास दिली. त्याची पोहोच आहे.

संस्थेतील भ्रष्टाचाराच्या चौकशीची अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. मात्र त्याबाबतची माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर शहर, रेल्वेलाईन, नवल पेट्रोलपंपाजवळ, सोलापूर श्री.सुनिल शिरापूरकर यानी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.यू.शिरापूरकर यानी दि.१६.७.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला. मूळ तक्रारीवरील कार्यवाही व सन २००४ ते २००९ या कालावधीतील संबंधित माहिती देण्याबाबतची कार्यवाही त्यात नमूद केली असून त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २६ जुलै २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आत्माराम यशवंत गुंड
मु.बुद्रुकवाडी, पो.मानेगाव, ता.माढा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आत्माराम यशवंत गुंड
मु.बुद्रुकवाडी, पो.मानेगाव, ता.माढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.सु.कि.दरबस्तवार

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.प्रमोद शंकर जोशी |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

विज मीटर आमच्या नावे असताना बिल दुसऱ्याच्या नावे येत होते, म्हणून हा मीटर कोणाच्या नावे आहे, याची माहिती मागितली होती. मीटर अस्तित्वात नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी यानी दिले व अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतर त्याचदिवशी मीटर आमच्या नावेच असल्याचे उत्तर त्यानी दिले. आधी खोटी माहिती दिली व आमच्या गावापासून त्यांच्या कार्यालयापर्यंत ३-४ चकरा मारावयास लावल्या, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.आत्माराम यशवत गुंड यानी केली.

अपीलकर्ता याना चुकीची माहिती तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यानी दिली. तसेच त्यासाठी त्याना वेळ व पैसे प्रवासापोटी खर्च करावे लागले. हे लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.एस.पी.राके यानी अपीलकर्त्यास रूपये २०००/- नुकसानभरपाईपोटी द्यावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२९.६.२०११ रोजी ही रक्कम अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे अपीलकर्त्याच्या पोहोचपावतीसह विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.प्रमोद शंकर जोशी यानी दि.२.७.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

अपीलकर्त्यास ७० दिवस विलंबाने माहिती देण्यात आली असून त्या कालावधीत माहिती देण्यास जबाबदार असलेले अधिकारी शास्तीस पात्र ठरतील. त्यांचा कालावधीनिहाय तपशील व विलंब, संभाव्य शास्ती याबाबतच्या लेखी खुलाशासह व स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल देण्याचे मौखिक आदेश आयागाने दिले होते. त्यानुसार अद्यापही अपिलीय प्राधिकारी तथा उपअभियंता,

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर यानी अहवाल सादर केलेला नाही. ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास विलंबाने माहिती देण्यास जबाबदार असलेल्या तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा कालावधीनिहाय तपशील, तसेच त्यांच्याकडून विलंबाचा कारणे व शास्तीविषयक म्हणणे यासह स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.सु.कि.दरबस्तवार यानी दि.२५.८.२०११ पर्यंत आयोगाला सादर न केल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**२६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नागनाथ सायबण्णा पाटील
६३, चंदन निवास, राजीवनगर,
अक्कलकोट रोड, मुटकेरी स्पिनींग मील मागे, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२९६/२०१०/सोलापूर + २११८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नागनाथ सायबण्णा पाटील
६३, चंदन निवास, राजीवनगर, अक्कलकोट रोड,
मुटकेरी स्पिनींग मील मागे, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.जी.आंबेडकर

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - १९७७-७८ मध्ये गैरमार्गाने आलेल्या अतिरिक्त शिक्षकांबाबतची तक्रार मी वेळोवेळी करीत होतो. सन २००२ व २००३ मध्ये शिक्षणाधिकाऱ्यांनी तत्कालीन उपशिक्षणाधिकारी श्री. तानाजी घाडगे यांना याबाबत चौकशीचे आदेश दिले. सन २००२-०३ मध्ये त्यानी सादर केलेल्या अहवालाची व सन १९८५ मध्ये विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. मणियार यानी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत वारंवार मागणी करुनही मिळत नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यानी कोणतेही उत्तर दिले नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही.

अपिलीय प्राधिकारी - तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी मूळ अर्जावर व अपिलावर कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तथापि अभिलेख तपासून अपीलकर्त्यास उत्तर दिले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस.के.सगरे यानी माहितीबाबत केलेली कार्यवाहीबाबतचा खुलासा शास्तीविषयीच्या म्हणण्यासह विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. मदारगनी मुजावर यानी ८ दिवसांत आयोगास सादर करावा. तसेच अपिलीय प्राधिकारी यांनी अभिलेखांचा शोध घेऊन माहितीबाबत अहवाल सादर करुन अपीलकर्त्यास त्याच्या प्रती पुरवाव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.जी.आंबेडकर यानी त्यानुसार पूर्तता केली नाही. अपिलीय प्राधिकारी यांना आयोगाने स्मरण दिल्यानंतर दि. ५/७/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास पाठविलेल्या उत्तराची प्रत आयोगास सादर केली. संबंधित चौकशी अहवाल उपलब्ध होत नसल्याचे त्यानी कळविले आहे.

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.जी.आंबेडकर यानी आयोगाच्या आदेशानुसार अनुपालन अहवाल व माहितीबाबतची कार्यवाही केलेली नाही. माहितीची जबाबदारी आयोगाने त्यांच्यावर सोपविल्याचे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम १९ (८) (ए, i,ii)अन्वये माहती देण्याबाबतच्या कार्यवाहीस ते जबाबदार ठरतात. परंतु अनेक अपिलांमध्ये याच प्रकारची पुनरावृत्ती ते करीत असल्याचे दिसून येते. (उदा. अपील क्र. १२८८/२००९, १३०६/२००९, १२७४/२०१०, १४६९/२०१०, १४९४/२०१०, १६२७/२०१०, २१८८/२०१०, २८४२/२०१०) ही बाब गंभीर आहे. माहिती देण्याबाबत व माहितीविषयी पूर्ततेबाबत ते दर्शवीत असलेली अनास्था व टाळाटाळ शास्तीस पात्र ठरते. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एस. के. सगरे यानी कोणताही खुलासा केलेला नाही, म्हणून तेही शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिले अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. माहिती-मागणीच्या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करण्याबाबत कोणताही खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एस. के. सगरे यानी सादर केलेला नाही. सबब माहिती नाकारण्याबद्दल त्याना रु. १०,०००/- शास्ती करण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. सगरे यांच्या ऑगस्ट २०११ व सप्टेंबर २०११ च्या अनुक्रमे सप्टेंबर २०११ व ऑक्टोबर २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून समान हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही शिक्षणाधिकारी (माध्य),जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. जी. आंबेडकर यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

३. आयोगाच्या आदेशानुसार माहितीबाबतच्या कार्यवाहीची पूर्तता न करुन पर्यायाने माहिती देण्याच्या प्रक्रियेत टाळाटाळ करण्याबाबत मूळ प्रकरणातील अपिलीय प्राधिकारी व

आयोगाने माहिती देण्याची जबाबदारी सोपविल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९ (८) (ए, i,ii) मधील तरतुदीनुसार जबाबदार ठरणारे शिक्षणाधिकारी श्री. एम.जी.आंबेडकर याना समज म्हणून रु. ५०००/- शास्ती करण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. एम.जी.आंबेडकर यांच्या ऑगस्ट २०११ च्या अनुक्रमे सप्टेंबर २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**प्रत,** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर याना पुढील कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मनोहर कृष्णाजी रानडे
६/१, तुंगभद्रा सोसायटी, गल्ली क्र.१, परमहंसनगर,
पौड रस्ता, कोथरूड, पुणे-४११०३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११०१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन
विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४६ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे प्रतिनिधी श्री.गट्टूवार देवन्त नरसिमलू

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.उत्तमचंद गुलाबचंद दुगड

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.मनोहर कृष्णाजी रानडे यानी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील गाळे बांधणीच्या निविदांसंदर्भातील माहिती मागितली होती. संबंधित नस्ती उपलब्ध करून देण्याबाबत लेखाधिकारी याना कळविले होते. हे काम वरिष्ठ लिपिक, पूल व प्रकल्प विभाग श्री.आर.एच.कदम यांच्याकडे असल्याचे व नस्ती त्यांच्याकडून उपलब्ध करून घ्यावी, असे लेखाधिकारी यानी कळविले. परंतु तेव्हा व अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतरही श्री.कदम याना कळवूनही त्यानी नस्ती उपलब्ध करून दिली नाही व कोणताही खुलासाही केला नाही. त्यामुळे विलंबाला ते जबाबदार आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.उत्तमचंद गुलाबचंद दुगड यानी केले.

संबंधित निविदा लिपिक श्री.आर.एच.कदम यांचा खुलासा घेऊन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.उत्तमचंद गुलाबचंद दुगड यानी आयोगाला सादर करावा व अपीलकर्त्यास माहिती नि:शुल्क पुरवावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.उत्तमचंद गुलाबचंद दुगड यानी दि.५.२.२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला व नस्ती विहित मुदतीत उपलब्ध करून न देण्यास श्री.कदम हेच जबाबदार असल्याचे त्यांच्या खुलाशाबाबतच्या पत्रासह स्पष्ट केले. नस्ती उपलब्ध करून देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यानी श्री.कदम याना कळविले असल्याचे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(४,५) नुसार ते मानीव जन माहिती अधिकारी ठरतात व उपलब्ध माहिती नाकारण्याबद्दल ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) वरीष्ठ लिपिक, पूल व प्रकल्प विभाग (पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी) श्री.आर.एच.कदम हे माहिती विहित मुदतीत उपलब्ध करून न देण्यास जबाबदार असल्यामुळे त्याना रूपये १०,०००/- शास्ती करण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यानी शास्तीची रक्कम श्री.आर.एच.कदम यांना सप्टेंबर २०११ व ऑक्टोबर २०११ या महिन्यात मिळणाऱ्या ऑगस्ट २०११ व सप्टेंबर २०११ या महिन्याच्या पगारातून वसूल करावी व '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अण्णा तुकाराम राऊत
राऊत सदन, स.नं.३६०अ/२ई/२ब, फ्लॅट नं.४, एस.टी.सोसायटी एरिया,
श्रीसाईनगर, विजापूर रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
उत्तर सोलापूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
उत्तर सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०१+११९९ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर
प्रतिनिधी श्री.गजानन काशिनाथ व्हनकडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

मजरेवाडी ग्रामपंचायतीने दिलेला बांधकाम परवाना, त्यासाठीचा नकाशा व अन्य कागदपत्रांच्या प्रती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.अण्णा तुकाराम राऊत यानी आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

संबंधित विभाग महानगरपालिकेच्या हद्दीत सन १९९२ मध्ये आला असून अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती फेब्रुवारी १९९० मधील आहे. ग्रामपंचायतीचे दप्तर तहसील कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले असून माहिती तेथून घेण्याबाबत अपीलकर्त्यास गटविकास अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत कळविले. (अपील क्र.११९९/२००९/सोलापूर). त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर यांच्याकडे अर्ज व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर यांच्याकडे अपील करूनही ही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अण्णा तुकाराम राऊत यानी (अपील क्र.१२०१/२००९/सोलापूर) केली आहे.

संबंधित विभाग महानगरपालिकेच्या कक्षेत गेला असून दप्तर महानगरपालिकेच्या सुपूर्त करण्यात आले असल्यामुळे अपीलकर्ता याना सोलापूर महानगरपालिकेने माहिती देणे अपेक्षित आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, उत्तर सोलापूर श्री.आर.जी.माने यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री.गजानन काशिनाथ व्हनकडे यानी सादर केले.

अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यानी सोलापूर महानगरपालिकेतील संबंधित विभागाशी संपर्क साधून अथवा अर्ज त्यांच्याकडे वर्ग करून पुढील कार्यवाही करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही त्यानी केलेली नाही. याबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर श्रीमती ए.पी.मरोड याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर यानी अपीलकर्त्यास हव्या असलेल्या माहितीबाबत सोलापूर महानगरपालिकेच्या संबंधित विभागाशी संपर्क साधून १५ दिवसात अपीलकर्त्यास माहिती द्यावी व अनुपालन अहवाल आयोगाला दि.२०.८.२०११ पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.म.अेजाज चाँदसाहेब कनूल
११५, रविवार पेठ, सोलापूर-५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, एम.ए.कस्तुरे हायस्कूल,
(हि.मा./म.मा.)७२२, शुक्रवार पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.म.अेजाज चाँदसाहेब कनूल
११५, रविवार पेठ, सोलापूर-५

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.जी.आंबेडकर

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

वारंवार मागणी करूनही जन माहिती अधिकारी मुदतीत व परिपूर्ण माहिती देत नाहीत. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यानी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यवाहीबद्दल नाराजी व्यक्त करून माहिती न दिल्यास शास्तीची शिफारस केली आहे. त्याना शास्ती होऊन माहिती मिळावी, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.म.अेजाज चाँदसाहेब कनूल यानी केली. आयोगापुढील सुनावणीला जन माहिती अधिकारी एकाही तारखेला उपस्थित नसल्याचे त्यानी निदर्शनास आणले.

माहितीबाबत केलेली कार्यवाही व विलंब झाला असल्यास / माहिती दिली नसल्यास शास्तीबाबतचे म्हणणे यासह जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एम.ए.कस्तुरे हायस्कूल, (हि.मा./म.मा.)७२२, शुक्रवार पेठ, सोलापूर यानी एका आठवड्यात खुलासा सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

अपीलकर्ता यानी सन १९९७ ते डिसेंबर २००७ अशा प्रदीर्घ कालावधीतील विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. ते प्रशालेत सहशिक्षक म्हणून कार्यरत असून आपल्या स्वतःच्या कामावर मुख्याध्यापकाचे नियंत्रण राहू नये म्हणून व केवळ त्रास देण्यासाठी ते सातत्याने अशा प्रकारचे अर्ज करीत असतात. त्या त्या वेळी त्याना माहिती देण्यात आलेली आहे.कारवाई करण्याचा अभिप्राय तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यानी दिला असला तरी त्यांच्यासमक्ष व टपालानेही सर्व माहिती दिली आहे व त्याबाबत आयोगास वेळोवेळी अवगत केले आहे. तसेच तत्कालीन मुख्याध्यापक श्री.एस.एम.शाबादे यांचे दि.८.६.२०१० रोजी निधन झाले असून त्यानंतर आपण कार्यभार स्वीकारल्यापासूनही अपीलकर्ता याना द्यावयाच्या माहितीबाबत कळविले आहे, असा खुलासा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, एम.ए.कस्तुरे हायस्कूल, (हि.मा./म.मा.)७२२, शुक्रवार पेठ, सोलापूर श्रीमती डी.के.कस्तुरे यानी दि.१९.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,

एम.ए.कस्तुरे हायस्कूल, (हि.मा./म.मा.)७२२, शुक्रवार पेठ, सोलापूर यानी त्याना वेळोवेळी उत्तरे दिली आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे निधन झाले आहे. अपीलकर्त्यास कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास जन माहिती अधिकारी यानी अभिलेख उपलब्ध करून त्यांच्या मागणीनुसार हवय असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देणे आवश्यक आहे. मात्र अर्जावर कार्यवाही केली असल्यामुळे व त्याबाबत आयोगास कळविले असल्यामुळे सुनावणीला उपस्थित राहण्याची गरज नाही, ही जन माहिती अधिकारी यांची भूमिका आक्षेपार्ह असून उपस्थित न राहिल्यास कारवाई होऊ शकते, याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची लेखी मागणी करावी. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास आवश्यक असलेले अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन त्यांच्या लेखी मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून पुरवाव्यात. यानुसार निश्चित तारीख व वेळ ठरवून कार्यवाही करून घेण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांची राहील. संबंधित कार्यवाहीनंतर त्याबाबतचा अहवाल अपिलीय प्राधिकारी यानी आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सत्वशील धैर्यशील शेळके
मु.पो.लोणंद, शिरवळ रोड, ता.खंडाळा, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१९,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी, विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१९,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५९ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सत्वशील धैर्यशील शेळके
मु.पो.लोणंद, शिरवळ रोड, ता.खंडाळा, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१९,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.सुनिल थोरवे

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी, विशेष भूमी संपादन अधिकारी क्र.१९,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.गुलाब भिकोबा रूपनवर

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : भूमी संपादनाचा प्रस्ताव, संबंधित कायद्याचे कलम ४(१) अन्वये संबंधिताना दिलेली नोटिस व बदली प्रस्तावाची नक्कल याची प्रत व अनुषंगिक कागदपत्रे मागितली होती. ती मिळाली नाहीत.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता वारंवार याच विषयातील कागदपत्रांची मागणी अर्ज, अपिले व पत्रव्यवहार याद्वारे करीत असतात. मात्र संबंधित संचिका उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, ता.वाई, जि.सातारा यांच्याकडे वर्ग केली असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती घेण्याबाबत अपीलकर्त्यास अर्ज वर्ग करून विहित मुदतीत कळविले. अशा स्वरूपाची कागदपत्रे आमच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत, असे अपीलकर्त्यास वेळावेळी कळविले आहे.

व्यक्तिगत स्वरूपाच्या एकाच विषयासंदर्भात अपीलकर्ता विविध पातळ्यांवर अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसून येते, अपीलकर्त्याची मागणी वैयक्तिक स्वरूपाची असून त्यात सार्वजनिक हिताचा कोणताही संदर्भ नाही. याच विषयासंदर्भातील त्यांच्या अपील क्र.३० / २००९ / सातारा या अपिलामध्ये आयोगाने यापूर्वी आदेश दिले आहेत. त्यानुसार संबंधित कार्यालयामध्ये शोध घेऊन अधिकाऱ्यानी वेळोवेळी अहवाल सादर केले आहेत व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरविलेली आहे.

प्रस्तुत अपिलात मूळ अर्ज अपीलकर्त्यांनी नमूद केलेल्या मागणीचा नाही, तर त्या संदर्भात अपीलकर्त्यानी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जावरील कारवाईबाबत, दप्तर दिरंगाई कायद्यानुसारची माहिती, नागरिकांची सनद इ. स्वरूपाची माहिती मागितली आहे. तथापि त्यांच्या मूळ मागणीच्या अनुषंगाने ही मागणी केली असल्याचे, अपवादात्मक बाब म्हणून आयागाने दखल घेतली व उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, ता.वाई, जि.सातारा यानी उपलब्ध माहिती अपीलकर्त्यास आठ दिवसांत द्यावी अथवा त्याबाबतची वस्तुस्थिती कळवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु अशा प्रकारे माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता यानी

दि.२९.१०.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. त्याबाबत आयोगाने दि.२७.१२.२०१० च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, ता.वाई, जि.सातारा यानी दि.१.१.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला व आयोगाच्या दि.४.१.२०११ च्या निर्देशाप्रमाणे संबंधित अहवालाची प्रत अपीलकर्त्यास पाठविली. संबंधित प्रकरणातील माहितीबाबत अपीलकर्त्यांना वारंवार कळवूनही नाहक त्रास देण्याच्या उद्देशाने व सूडबुध्दीने ते वारंवार अर्ज करीत आहेत, असे त्यानी या अहवालात म्हटले आहे. त्याची नोंद घेण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.राजेंद्रबापू शंकर कुमकर
स.नं.३४/२, खराडी रोड, चंदननगर, खराडी, पुणे-४११०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली,
९३१,शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे-२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली,
९३१,शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९६७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** ॲड.राजेंद्रबापू शंकर कुमकर
स.नं.३४/२, खराडी रोड, चंदननगर, खराडी, पुणे-४११०१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली,
९३१,शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे प्रतिनिधी श्री.एस.आर.परब

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, ९३१,शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे प्रतिनिधी श्री.पी.व्ही.धानेपकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : गाव मौजे आगळंबे, ता.हवेली, जि.पुणे येथील मिळकतीबाबतऑगस्ट २००७ मध्ये झालेले आदेश व त्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती मागितल्या होत्या. संबंधि संचिका उपलब्ध होत नसल्याचे जन माहिती अधिकारी यानी कळविले.

जन माहिती अधिकारी : सन २००७ मध्ये तहसीलदार, हवेली, जि.पुणे यांच्या कार्यालयाने दिलेले आदेश असून संबंधित वारस नोंद झाली आहे. जमीन शाखेचा हा आदेश असून संचिका आढळून येत नाही. अभिलेख वर्गवारीनुसार ही कागदपत्रे १५ वर्षे जतनाची आहेत.

अपीलकर्त्याच्या मागणीनुसार प्रमाणित प्रती करून देणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार बंधनकारक नाही. मात्र जतनाच्या कालावधीनुसार संबंधित संचिका उपलब्ध असणे आवश्यक आहे व तशी ती उपलब्ध होत नसल्यास जबाबदार असणाऱ्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अन्वये कारवाई केली गेली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांचा शोध घेऊन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी दि.१६.८.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा व

त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी. संबंधित संचिका उपलब्ध न झाल्यास जतनाची जबाबदारी असणाऱ्या कर्मचाऱ्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम,२००५ अन्वये कारवाई करून अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, ९३१,शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे यानी दि.१०.९.२०११ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. जयेश दिलीप गायकवाड
मु. हिंगणी (पां), पो. मळेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद उपविभाग बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२३९/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. जयेश दिलीप गायकवाड
मु. हिंगणी (पां), पो. मळेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी, जि. सोलापूर श्री. संजय नामदेव आळतेकर

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद उपविभाग बार्शी, जि. सोलापूर श्री. पांडुरंग हरिबा कांबळे

| | |
|---|---|
| | **तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. एस.ए.पाटील<br><br>**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. एन. डी. भोसले |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपिलकर्ता - पिंपरी (सां) विकास नगर ते हिंगणी (पां) रस्त्याबाबत व इतर कामाची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी ती दिली नाही म्हणून शास्ती करावी.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता यानी कालावधी न देता संदिग्ध स्वरुपात माहिती मागितली आहे. संदर्भित रस्त्याबाबतची माहिती दिली. सन २००१ ते २००७ या कालावधीतील नेमक्या कोणत्या योजनेची कोणती माहिती पाहिजे, याबाबतचा तपशील त्यानी दिलेला नाही. एकूण योजनांपैकी नेमक्या माहितीबाबत विचारणा केली असता त्यानी उत्तर दिले नाही. तसेच दारिद्रय रेषेखालील असल्याचे त्यानी नमूद केले असले तरी त्यानी दिलेल्या यादीत त्यांचे नाव नव्हते व त्यांच्या समावेशाबाबतचा पुरावा दिलेला नव्हता.

अपिलीय प्राधिकारी - नेमक्या कोणत्या योजनेची कोणती माहिती हवी आहे, याचा तपशील जन माहिती अधिकाऱ्यांकडे देण्याबाबत अपीलकर्त्यास अपील निर्णयात कळविले होते. शुल्क भरावे किंवा दारिद्रय रेषेखाली असल्यास पुरावा द्यावा, असे त्याना कळविले होते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी संदिग्ध स्वरुपाच्या माहितीची मागणी केली आहे. नेमकी कोणती माहिती हवी याचा तपशील अपीलकर्त्यांनी देणे, तसेच दारिद्रय रेषेखालील यादीत समावेश असल्यास त्याबाबतचा पुरावा देणे आवश्यक आहे. तसे न केल्यास हव्या असलेल्या माहितीबाबतचा नेमका तपशील दिल्यानंतर योग्य

ते शुल्क भरुन त्यानी माहिती प्राप्त करुन घ्यावी. पुरावा दिल्यास संबंधित विभागाकडे उपलब्ध अनुदानात शक्य ती माहिती जन माहिती अधिकाऱ्यांना अपीलकर्त्यास द्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हणमंत दशरथ इंगोले
मु. पो. एखतपूर, ता. सांगोला. जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, सांगोला, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, मु. पो. एखतपूर, ता. सांगोला. जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३०/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. हणमंत दशरथ इंगोले
मु. पो. एखतपूर, ता. सांगोला. जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, सांगोला, जि. सोलापूर श्री. एस. आर. पवार

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, मु. पो. एखतपूर, ता. सांगोला. जि. सोलापूर श्री. के.डी.कदम

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले.

विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एम. डी. म्हेत्रे यानी विहित मुदतीत माहिती दिली नाही. माहिती आजच देतो असे त्यानी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितले होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एम. डी. म्हेत्रे यानी माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीविषयी लेखी खुलासा, शास्ती विषयीच्या म्हणण्यासह ३ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एम. डी. म्हेत्रे यानी दि. ३०.६.२०११ च्या पत्रान्वये पाठविलेला खुलासा दि. १२/७/२०११ रोजी आयोगास प्राप्त झाला. अपीलकर्ता श्री. हणमंत इंगोले स्वतः व अन्य व्यक्तींना हाताशी धरुन विविध पातळयांवरुन गावातील कामांबाबत तक्रार करणे, विविध स्वरुपाचे आरोप करणे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा दुरुपयोग करुन गावाची बदनामी करणे असे प्रकार सातत्याने करीत असल्यामुळे ते व त्यांचे ३ सहकारी यांच्यावर कारवाई करण्याचा ठराव ग्रामपंचायतीने सर्वानुमते केला. त्यातील ठराव मान्य व्यक्तींच्या जीविताला व सुरक्षिततेला धोका होऊ नये म्हणून त्याना तो तपशील दिला नाही. अन्य माहिती दिली आहे. तंटामुक्त गाव समितीच्या बैठकीत त्यांच्याशी झालेल्या चर्चेच्या वेळी त्याना माहितीची आवश्यकता नसून आपल्या शेतातील रस्त्याच्या कामाबाबत तक्रार असल्याचे सांगितले व तो रस्त्याचा वाद तंटामुक्त समितीने संपवावा, अशी मागणी त्यानी केली. श्री. हणमंत इंगोले व श्रीमती भामाबाई कारंडे यांनी खोटया तक्रारी करुन व माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करुन मला प्रचंड त्रास दिला आहे. त्यामुळे मी बदली करुन घेतली, असे श्री. म्हेत्रे यानी खुलाशात म्हटले आहे. तसेच संबंधित

व्यक्तींबरोबर झालेल्या संवादाची सी.डी.ही आयोगाला सादर केली आहे. हा तपशील लक्षात घेता अपीलकर्त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर योग्य रितीने केल्याचे दिसून येत नाही. या बाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजयसिंह तुकाराम जाधव
मु. शेंडचिंच, पो. मळोली, ता. माळशिरस, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, ता. माळशिरस, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मु. शेंडचिंच, पो. मळोली, ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२५/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. विजयसिंह तुकाराम जाधव
मु. शेंडचिंच, पो. मळोली, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. किसन वसंत खरात

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - राजेंद्र भारत जाधव यांचे दारिद्रय रेषेखालील यादीतील नाव कमी करुन माझे स्वतःचे नाव या यादीत समाविष्ट करण्याची मागणी केली होती. परंतु त्यानुसार कार्यवाही झाली नाही व माहितीही मिळाली नाही.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> - अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार कार्यवाही करु नये असे ग्रामसभेत ठरले. त्यांची मागणी पंचायती समोर ठेवून श्री. राजेंद्र भारत जाधव यांचे म्हणणे मागवून ग्रामसभेत निर्णय घेण्यास लागलेल्या अवधीमुळे त्याना उत्तर देण्यास विलंब झाला, असे ग्रामसेवक यानी लेखी दिले आहे.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकाऱ्यांचे निवेदन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण बाबू तरटे
द्वारा-श्री.अनिल प्रभाकर मोदळे
किराणा मालाचे दुकान, मेनरोड, मु.पो.इंदापूर, जि.पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इंदापूर तहसील कार्यालय,
ता.इंदापूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.लक्ष्मण बाबू तरटे
द्वारा-श्री.अनिल प्रभाकर मोदळे
किराणा मालाचे दुकान, मेनरोड, मु.पो.इंदापूर, जि.पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे
श्री.ना.प्र.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर तहसील कार्यालय,
ता.इंदापूर, जि.पुणे श्री.बी.जे.गोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

१३ वर्षापूर्वी झालेल्या जमिनीच्या नोंदी मंडल अधिकारी यानी रद्द केल्या. त्याबाबतची कारणे व संबंधित कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. परंतु कागदपत्रे आढळ होत नसल्याचे कळवून माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.लक्ष्मण बाबू तरटे यानी केले.

जमीन वाटपाच्या संदर्भातील अपीलकर्त्याची तक्रार होती. संबंधित नस्ती उपलब्ध होत नव्हती. तिचा शोध घेऊन नकला प्राप्त करून दिल्या, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.बी.जे.गोरे यानी केले.

संबंधित नकला प्राप्त झाल्या असून तक्रार व हरकत राहिलेली नाही, असा लेखी जबाब अपीलकर्त्यांनी दि.२१.७.२००९ रोजी दिला असल्याचे नमूद करून अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.ना.प्र.पाटील यानी जबाबाची प्रत सादर केली.

मागितलेल्या नकला प्राप्त झालेल्या असताना व तसा लेखी जबाब दिल्यानंतरही आयोगाकडे अपील दाखल करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. त्याबाबत त्याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बुरहान बाबासाहेब नाईकवाडी
रि.स.नं. ८३१/प्लॉट नं. २४, साई पार्क,
ई वॉर्ड, भोसलेवाडी, बावडा रोड, कोल्हापूर ४१३ ००३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, कोल्हापूर ४१६ ००३

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्र अधिकारी,
उप प्रादेशिक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
उद्योग भवन, कोल्हापूर ४१६ ००३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१४/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन,
कोल्हापूर श्री. अमर बाळासाहेब दुगुळे

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्र अधिकारी,
उप प्रादेशिक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,

| | |
|---|---|
| | उद्योग भवन, कोल्हापूर श्री. नवनाथ संभाजी अवताडे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बुरहान बाबासाहेब नाईकवाडी यानी कोल्हापूर महानगरपालिकेच्या कचरा प्रकल्पाबाबतची माहिती दि. ८/७/२००९ च्या अर्जान्वये मागविली होती. दि. ४/८/२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय माहिती दिली. याच विषयाच्या संदर्भात त्यांचे १० ते १२ अर्ज असून आमच्या मुख्यालयाकडून आलेलीही पूर्ण माहिती त्याना दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र अधिकारी, उप प्रादेशिक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, कोल्हापूर श्री. नवनाथ संभाजी अवताडे व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, कोल्हापूर श्री. अमर बाळासाहेब दुगुळे यानी केले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळास सन २००७ च्या अहवालाबाबत पाठविलेल्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास अप्राप्त आहे ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयाकडून पाठविलेल्या पत्रानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी दि. २०/८/२०११ पर्यंत आयोगास सादर न केल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गुलाबहुसेन कासीमसाहेब शेख
६१०/११, उत्तर कसबा, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पनचक्की, औरंगाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पनचक्की, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/२/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ पनचक्की, औरंगाबाद<br>यांचे प्रतिनिधी श्री. एस. एन. जाफर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जुने मुस्लिम कब्रस्तान ट्रस्टवर एकाच कुटुंबातील व्यक्ती विश्वस्त कसे होऊ शकतात. अशा विश्वस्तांकडून वक्फ मंडळाचे सदस्य दरमहा हप्ता घेत असून त्यामुळे खरी माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी मागितलेली उपलब्ध माहिती दिली. संबंधित धर्मादाय न्यासाच्या संदर्भातील माहिती विश्वस्तांकडून मागितली असून त्यानी न दिल्यामुळे देता येत नाही. या धर्मादाय न्यासामध्ये गैरप्रकार होत असल्यास त्याबाबतची कार्यवाही हा स्वतंत्र नियमांतर्गत येणारा विषय आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तो येत नाही. वक्फ मंडळाकडे संपूर्ण राज्यभरातील कामे असून अत्यंत अपुरा कर्मचारीवर्ग आहे. त्यामुळे मंडळाच्या कक्षेतील धर्मादाय न्यासाविषयीचे कामकाज सांभाळून या संस्थेकडून मागवून माहिती देणे अनेकदा मुदतीत शक्य होत नाही.

अपुरा कर्मचारीवर्ग हे कारण माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित मुदतीत कार्यवाही न करता येण्यास समर्थन ठरु शकत नाही. तथापि अन्वयार्थ व प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. संबंधित न्यासाची नियमावली व योजनापत्रक अपीलकर्त्यास ७ दिवसांत पुरवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हौसराव शंकर झिंजाडे
मु. पो. पोथरे (माळवाडी), ता. करमाळा, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सरव्यवस्थापक,
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,
२०७/८/९, गोल्डफिंच पेठ, सोलापूर ४१३ ००७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, पोथरे,
ता. करमाळास, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२२९/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक,
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, पोथरे,
ता. करमाळास, जि. सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. सी.आर. राठोड

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला शासनाचे भांग भांडवल वा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वरुपाचे अन्य कोणतेही अर्थसहाय्य मिळत नाही. तरी उपलब्ध माहिती दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा, पोथरे, ता. करमाळास, जि. सोलापूर श्री. आर. एल. उत्पात यानी केले.

शासनाच्या कर्ज माफी योजनेत अपीलकर्त्याकडून बँकेने ऊस बिलातून कर्ज वसूल केले. ते कशाच्या आधारे केले, अशी विचारणा अपीलकर्त्यांनी अपील अर्जात केली आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रवींद्र मेघःशाम इनामदार
बी-२५/बी, मेन कॉलनी, मु.पो.वालचंदनगर, ता.इंदापूर, जि.पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सहसंचालक, शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०२९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.रवींद्र मेघःशाम इनामदार<br>बी-२५/बी, मेन कॉलनी, मु.पो.वालचंदनगर,<br>ता.इंदापूर, जि.पुणे-१४<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.सदानंद शंकरराव शिंदे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : डिप्लोमा इन हायर एज्युकेशन (डि.एच.ई.) ही पदव्युत्तर पदविका धारण करणाऱ्या शिक्षकांचे सेवाज्येष्ठता सूचीमधील सध्याचे स्थान व त्यानुसार पदोन्नती याबाबतची माहिती मागितली होती. अद्ययावत माहिती मिळाली नाही. याच विषयाच्या अनुषंगाने न्यायालयात माझ्या बाजूने निकाल झाला असल्यामुळे व मी उपप्राचार्य पदास पात्र असूनही डावलले जात आहे. त्यामुळे माहिती मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी : संबंधित विषयाबाबतच्या नियमावलीची माहिती दिली. डि.एच.ई.धारकांबाबत दि.२२.८.२००८ रोजी आमच्या कार्यालयाने शासनाला प्रस्ताव सादर केला असून त्यावरील सद्यस्थितीची माहिती आमच्याकडे अद्यापपर्यंत आलेली नाही.

अपीलकर्ता यानी केलेली विचारणा संदिग्ध स्वरूपाची असून स्पष्टीकरण, अन्वयार्थ, अशी मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि दि.२२.८.२००८ रोजी शिक्षण संचालनालयाने शासनाला सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत व शासनाने त्याबाबत केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत अपीलकर्त्यास द्यावी, तसेच संबंधित प्रस्तावावरील कार्यवाहीच्या सद्यस्थितीची माहिती सचिव, शिक्षण संचालनालय(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यानी अपीलकर्त्यास देण्याबाबत त्याना कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.सदानंद शंकरराव शिंदे यानी आयोगाला सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अब्दुलसत्तार महंमद मोमीन
पंचायत समिती, मुळशी (पौड), ता.मुळशी, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८१३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अब्दुलसत्तार महंमद मोमीन
पंचायत समिती, मुळशी (पौड), ता.मुळशी, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे
श्री.पोपट दगडू भंडारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

<u>**विवेचन**</u>

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : गोपनीय अहवालात प्रतिकूल शेरे लिहिल्याच्या संदर्भात अपील केले होते. वरिष्ठ वेतनश्रेणी / कालबध्द पदोन्नती बरोबरीच्या इतर कर्मचाऱ्यांना दिली. मात्र प्रतिकूल शेऱ्यामुळे मला पदोन्नती न देऊन अन्याय केला आहे.

<u>जन माहिती अधिकारी</u> : सन २००१ मधील गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेऱ्यांच्या अनुषंगाने केलेल्या अपिलावरील कार्यवाहीची अपीलकर्त्याची मागणी आहे.

अपीलकर्त्याची तक्रार व मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापी त्यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्याना दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) वरिष्ठ वेतनश्रेणी, पदोन्नती याबाबत अपीलकर्त्याच्या मागणीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यानी अपीलकर्त्यास पुरवून दि.२०.८.२०११ पर्यंत अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दगडू पंढरीनाथ जाधव
उपळाई रोड, देशमुख प्लॉट, श्रीकृष्ण कॉलनी, मु.पो.ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर,
१४५-अ, रेल्वेलाईनजवळ, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर,
१४५-अ, रेल्वेलाईनजवळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९१ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दगडू पंढरीनाथ जाधव
उपळाई रोड, देशमुख प्लॉट, श्रीकृष्ण कॉलनी, मु.पो.ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर,
१४५-अ, रेल्वेलाईनजवळ, सोलापूर श्री.ना.ना.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर,
१४५-अ, रेल्वेलाईनजवळ, सोलापूर

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : आमचे शेजारी श्री.विकास पाठक यानी आमच्याविरुध्द खोटा अर्ज केला. बनावट दस्तऐवज करून दिला. त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी केली होती. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यानी कारवाई केली नाही व कर्तव्यात कसूर करून माझी चौकशी केल्यामुळे माझ्या गावात माझी मानहानी झाली. त्याबाबतची खरी माहितीही दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता याना कागदपत्रानुसार उपलब्ध माहिती दिली. याच संदर्भात त्यांचे चार अर्ज असून त्यांच्या तक्रारीबाबत भरारी पथकाच्या निरीक्षकांना कळविले होते. त्यानी दिलेल्या अहवालाची प्रतही अपीलकर्त्यास दिली आहे. संबंधिताविरूध्द कायदेशीर कारवाई करण्याची त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कक्षेत येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या तक्रारीबाबत संबंधित विभागाने केलेली कार्यवाही कायदेशीर की बेकायदेशीर, हे ठरविणे व त्यांच्या मागणीनुसार संबंधितांवर कारवाई करणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित प्रकरणातील सर्व अभिलेखांचे अवलोकन जन माहिती अधिकारी यानी करू द्यावे. त्यातील हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्ता सशुल्क प्राप्त करून घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज़्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमणप्रित सिंग
सनशाईन पार्क, फ्लॅट नं.५, बालेवाडी, पुणे-४११०४५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
लोहमार्ग पुणे यांचे कार्यालय, संगम ब्रीजजवळ, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय),
लोहमार्ग पुणे यांचे कार्यालय, संगम ब्रीजजवळ, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७६ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.रमणप्रित सिंग<br>सनशाईन पार्क, फ्लॅट नं.५, बालेवाडी, पुणे-४११०४५<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय), लोहमार्ग पुणे यांचे कार्यालय, संगम ब्रीजजवळ, पुणे श्री.अनिसअहमद सुलेमान काझी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.शेषराव सूर्यवंशी यानी मालमत्ता घेण्यासाठी केलेल्या अर्जासह त्यांच्याबाबतची विविध स्वरूपाची माहिती मागितली होती. ती व्यक्तीगत असल्याच्या कारणावरून जन माहिती अधिकाऱ्यानी दिली नाही.

जन माहिती अधिकारी : श्री.सूर्यवंशी यांच्या नियुक्तीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्त्यांना दिली. मालमत्तेसाठी त्यानी केलेल्या अर्जाची माहिती आमच्या कार्यालयाकडे नसते. अन्य माहितीत त्यांच्या पॅन कार्डची प्रत इ.स्वरूपाची मागणी होती. माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे श्री.सूर्यवंशी याना विचारणा केली असता ती देऊ नये, असे त्यानी कळविले. त्यामुळे दिली नाही.

मालमत्ता खरेदीसाठी श्री.सूर्यवंशी यानी अर्ज केला असल्यास त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी. तसेच त्यांच्या वेतनचिठ्ठीची प्रत / पगाराची माहिती द्यावी. मात्र पॅन कार्डच्या प्रतीसारखा तपशील व्यक्तिगत स्वरूपाचा असून तो देऊ नये असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२८.६.२०११ च्या पत्रान्वय पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक(मुख्यालय), लोहमार्ग पुणे यांचे कार्यालय, संगम ब्रीजजवळ, पुणे श्री.अनिसअहमद सुलेमान काझी यानी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. स्वप्नील हनुमंत पवार
मु. पो. चिंचोली, ता.बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०५६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्र शेळके | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

बार्शी शहर व तालुक्यातील रास्त धान्य दुकानांबाबतची व ग्राहकांच्या तपशीलासह यादी अपीलकर्ता श्री. स्वप्नील हनुमंत पवार यानी मागितली होती. त्याच दरम्यान लोकसभेच्या निवडणुक प्रक्रियेमळे कर्मचारी त्या कामात गुंतलेला होता. हे काम संपताच व दुकानदारांकडून प्राप्त करुन, संकलित करुन उपलब्ध तेवढी माहिती अपीलकर्त्यास दिली. अपीलकर्ता दारिद्रय रेषेखालील असून संपूर्ण तालुक्यातील प्रत्येक स्वस्त धान्य दुकानाच्या नोंदवहयांच्या पावत्या आदिंच्या छायांकित प्रती निःशुल्क द्यावयाच्या झाल्यास प्रचंड खर्च येईल व तेवढे अनुदान आमच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, जि. सोलापूर श्री. राजेंद्र शेळके यानी केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिपक शंकर भंडारे
९८/२५, अभिषेकनगर, जुळे सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य),
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१२/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.जी.आंबेडकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

श्री. मल्लिकार्जून हायस्कूल, हत्तूरेनगर, मजरेवाडी, सोलापूर या शाळेची सन १९८९ ते २०१० या काळातील माहिती अपीलकर्ता श्री. दिपक शंकर भंडारे यानी मागितली आहे. याच शाळेबाबत अपीलकर्ता याच स्वरुपाची व प्रदिर्घ कालावधीची माहिती सातत्याने मागत असल्याचे दिसून येते. या मागणीत कोणताही सार्वजनिक हिताचा विषय नसून व्यक्तिगत संदर्भात आहे, असे अपीलकर्त्यांच्या यापूर्वीच्या अपील क्र. २६८७/२०१०/सोलापूर मधून दिसून येते. ते लक्षात घेता अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती सशुल्क प्राप्त करुन घेता येतील. अपिलीय प्राधिकारी यानी तसे अभिलेख अवलोकनासाठी अपीलकर्त्यास कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. ५/७/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविल्याचे अपिलीय प्राधिकारी यानी आयोगास अवगत केले. आयोगाच्या आदेशानुसार त्वरित कार्यवाही न केल्यास अपिलीय प्राधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी लागेल याची समज अपिलीय प्राधिकारी याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जगन्नाथ धुळदेव वाघमोडे
मु.पो.माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०६० / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.राजेश भगवान पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.आण्णाप्पा इराप्पा बिरादार | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

म्हसवड-माळशिरस-अकलूज रस्त्यावरील बीएसएनएलच्या ठेकेदाराने केबलबाबतची, तसेच आमच्या कार्यालयाच्या कार्यकक्षेतील सर्व रस्त्याबाबतची सविस्तर माहिती अपीलकर्ता

श्री.जगन्नाथ धुळदेव वाघमोडे यानी मागितली होती. संबंधित जागी मी नव्यानेच रूजू झालेलो असल्यामुळे, तसेच त्याच कालावधीमध्ये आषाढी यात्रेविषयीची कामे चालू असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. संकलित करून माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.आण्णाप्पा इराप्पा बिरादार यानी केले.

अपीलकर्ता कंत्राटदार असून या विभागात काम मिळावे, अशी त्यांची मागणी आहे. दोन अर्जांद्वारे त्यानी माहिती मागितली होती. विलंबाबाबत जन माहिती अधिकारी याना समज दिली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.राजेश भगवान पाटील यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यानी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. अपीलकर्ता यानी माहितीच्या मागणीत कोणताही कालावधी नमूद केलेला नाही. तसेच नेमकेपणाने माहिती न मागता 'रस्त्यांबाबतची सविस्तर' अशा स्वरूपात माहिती मागितली आहे. मात्र विहित मुदतीत उत्तर/माहिती देणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर श्री.आण्णाप्पा इराप्पा बिरादार याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधीरकाका कुलकर्णी
सप्तश्रृंग अपार्टमेंट, फ्लॅट नं.३, पहिला मजला, प्लॉट नं.५,
स.नं.२०/३/५/६, रोहितनगर, बावधन खुर्द, पुणे-२१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी सल्लागार (प्र.), विधी सल्लागार कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरलेखनिक, विधी सल्लागार कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९६० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी सल्लागार (प्र.), विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड.मंजुषा इधाटे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सरलेखनिक, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड.निशा चव्हाण | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

सोने-चांदीबाबतच्या न्यायालयीन प्रकरणातील वकिलांच्या नेमणुकीसंदर्भातील पूर्ण माहिती मिळाली नाही. महानगरपालिकेच्या वकिलांनी चालविलेल्या दाव्यांची आकडेवारी मिळाली. परंतु

त्याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या नाहीत. वकिलांनी आकारलेल्या शुल्कासह सर्व माहिती तपशीलवार मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुधीरकाका कुलकर्णी यानी आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्ता श्री.सुधीरकाका कुलकर्णी यानी दि.३.८.२०१० च्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती दि.२.९.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय दिली. ज्या स्वरूपात माहिती ठेवली जाते त्या स्वरूपात ती देण्यात आली असून अपीलकर्त्याच्या मागणीनुसार यादी ठेवली जात नसल्याचे त्याना कळविले. त्यांच्या विचारणेनुसार माहिती दिली. कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास व नेमक्या प्रतींची मागणी त्यानी केल्यास अथवा अभिलेखाचे अवलोकन करून लेखी यादी दिल्यास त्यानुसार प्रती देता येतील, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सरलेखनिक, विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड.निशा चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा विधी सल्लागार (प्र.), विधी सल्लागार कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ॲड.मंजुषा इधाटे यानी केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्यांनी मूळ अर्जात मागितलेल्या माहितीचाच विचार अपिलात केला जाईल. तसेच त्यानी नेमकेपणाने माहितीची मागणी करणे आवश्यक असून कारणे, खुलासा व अभिप्राय अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष भिमराव गावसाने
शिवबा निवास, शिवाजीनगर, मु.पो.माढा, ता.माढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले जीवन शिक्षण प्रसारक व अपंग सेवा मंडळ, वलगुड, ता.जि.उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३७+११३८ / २०११ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष भिमराव गावसाने
शिवबा निवास, शिवाजीनगर, मु.पो.माढा, ता.माढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, उस्मानाबाद
प्रतिनिधी श्री.म.वि.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले जीवन शिक्षण
प्रसारक व अपंग सेवा मंडळ, वलगुड, ता.जि.उस्मानाबाद श्री.भारत संभाजी सरवदे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुभाष भिमराव गावसाने यानी जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्याकडे आमच्या संस्थेबाबत तक्रारी अर्ज दिला होता व आमच्याकडे १ एप्रिल २००६ पासून अद्यापपर्यंत झ ाालेल्या सर्व बैठकांचे इतिवृत्त आदी सविस्तर माहिती मागितली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या विचारणेला पुराव्यानिशी उत्तर दिले. तसेच अपीलकर्त्यास शुल्क कळविले. जिल्हाधिकारी व समाजकल्याण अधिकारी यांनी कळवूनही अपीलकर्त्यांनी शुल्क भरलेले नाही, म्हणून माहिती दिली नाही. ५० लाख रूपयाचा खोटा चेक तयार करून अपहार केल्याप्रकरणी अपीलकर्ता तुरूंगात होते. खोटे प्रमाणपत्र त्यानी तयार केले होते व उच्च न्यायालयात त्यांच्याविरूध्द प्रकरण दाखल आहे. संस्थेला ते ब्लॅकमेल करू पहात आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, महात्मा ज्योतिबा फुले जीवन शिक्षण प्रसारक व अपंग सेवा मंडळ, वलगुड, ता.जि.उस्मानाबाद श्री.भारत संभाजी सरवदे यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी शुल्क कळविल्याचे पत्र आपल्याला मिळाले नाही, असे अपीलकर्त्यांनी नमूद केले असले तरी युपीसीने पत्र पाठविल्याचा पुरावा जन माहिती अधिकाऱ्यानी सादर केला आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास शुल्क भरून माहिती प्राप्त करून घेता येईल. अपीलकर्ता संस्थेस ब्लॅकमेल करीत असल्याच्या आरोपाबाबत आवश्यक वाटल्यास जन माहिती अधिकारी योग्य ती कायदेशीर कारवाई करू शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २६ जुलै २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिपक शंकरआप्पा जतकर
लक्ष्मी नरसिंह अपार्टमेंट, घर क्र. १५२८,
बालाजी मंदिराजवळ, दाजी पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस अधीक्षक,
सोलापूर ग्रामीण, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलिस उपअधीक्षक,
सोलापूर ग्रामीण, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२४९/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |
| ३ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गुन्हा प्रकरणातील बक्षिसांची रक्कम संबंधित पोलिस अधिकारी व कर्मचारी याना प्रदान केल्याबाबतची माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. दिपक शंकरआप्पा जतकर यानी केली

आहे. याबाबत महालेखापाल, मुंबई याना कळविण्यात आले असल्याचे दिसून येते, असे जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री. धनंजय जाधव यानी नमूद केले. संबंधित विषय सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाच्या कक्षेतील असल्याचे त्यानी नमूद केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार पोलिस आयुक्तालयाच्या कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या गुन्हे प्रकरणातील बक्षिसाच्या रक्कमेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपायुक्त (मु), पोलिस आयुक्त कार्यालय, सोलापूर श्री. राजेंद्र माने यानी अपीलकर्त्यास दि. २०/८/२०११ पर्यंत पुरवून अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,

नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,

कौन्सिल हॉल समोर, पुणे  ४११ ००१

श्री.किसन मल्लिकार्जुन कनकुरे

१५१ / २९४-२९५, लक्ष्मीनगर, लक्ष्मी पेठ, सोलापूर                    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,

जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर                    उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक, व्यापारी सहकारी बँक लि.सोलापूर,

४५२, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६१ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किसन मल्लिकार्जुन कनकुरे

१५१ / २९४-२९५, लक्ष्मीनगर, लक्ष्मी पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,

| | |
|---|---|
| | जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर प्रतिनिधी श्री.अे.डी.सातपुते |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : व्यापारी सहकारी बँक लि.सोलापूर ही बँक विभागीय सहनिबंधक, सहकारी सस्था, पुणे यांच्या नियंत्रणाखालील असून या बँकेतील विशेष वसुली अधिकाऱ्यांच्या नेमणुकाबाबतची माहिती मागितली होती. अपिलीय प्राधिकारी यानी आदेश देऊनही बँकेने ती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : माहिती बँकेच्या स्तरावरील असल्यामुळे अर्ज बँकेकडे वर्ग केला होता. वसुली अधिकाऱ्यांच्या पदांना विभागीय सहनिबंधक मंजूरी देतात. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे बँकेचे म्हणणे आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ (रीट पिटीशन क्र.५२९४ / २००८, दि.२८.४.२००९) या प्रकरणी दिलेल्या निर्णयाप्रमाणे या बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तथापि विभागीय सहनिबंधक, सहकार संस्था, पुणे यानी अपीलकर्त्यास संबंधित वसुली अधिकाऱ्यांच्या नियुक्तीबाबतची माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, व्यापारी सहकारी बँक लि.सोलापूर, ४५२, पश्चिम मंगळवार पेठ, सोलापूर श्री.एस.एस.मोरे यानी १५ जून २०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २६.७.२०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सूर्यकांत सोपान लोखंडे
मु. सुपली, पो. पळशी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ,
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह, सुपली, पो. पळशी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक,
समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९२१/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ,
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. सुनिल ना. खमितकर

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह, सुपली, पो. पळशी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. गणेश शिवाजी जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक,

| | |
|---|---|
| | समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.आर.लिंगवज |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सूर्यकांत सोपान लोखंडे यानी मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृहाच्या संदर्भातील सन २००३ ते २०१० या कालावधीतील विविध स्वरुपाची माहिती मागितली होती. उपलब्ध माहिती त्याना समक्ष दिली. वसतीगृहात प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या जातीच्या व उत्पन्नाच्या दाखल्याच्या प्रती त्यानी मागितल्या होत्या. त्या देता येणार नाही, असे कळविले. विविध स्वरुपाची माहिती ते सतत मागतात व माहितीव्यतिरिक्तच्या त्यांच्या अपेक्षा असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह, सुपली, पो. पळशी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. गणेश शिवाजी जाधव, जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, सोलापूर श्री.व्ही.आर. लिंगवज व अपिलीय प्राधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. सुनिल ना. खमितकर यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती देण्याबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. विद्यार्थ्यांच्या जातीच्या व उत्पन्नाच्या दाखल्याच्या प्रती तसेच त्यांचे निवासी पत्ते ही माहिती वैयक्तिक स्वरुपाची असून अन्य व्यक्तींना देता कामा नये.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मारुती वैजिनाथ जाधवर
मु. बोरगांव (खुर्द), पो. चारे, ता. बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सर व्यवस्थापक,
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, गोल्ड फिंच पेठ,
सोलापूर ४१३ ००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७१७/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मारुती वैजिनाथ जाधवर
मु. बोरगांव (खुर्द), पो. चारे, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर
यांचे प्रतिनिधी श्री. अे. डी. सातपुते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, गोल्ड फिंच पेठ, सोलापूर या बँकेने पूर्ण माहिती दिलेली नाही अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मारुती वैजिनाथ जाधवर यानी केली.

अपीलकर्ता यानी मागणी केलेली माहिती बँकेच्या स्तरावरील होती. ती देण्याबाबत बँकेला कळविले. त्यानंतर बँकेने माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी सरव्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, गोल्ड फिंच पेठ, सोलापूर श्री. आर. एल. उत्पात यानी केले.

अपीलकर्त्यास हव्या असलेल्या तपशिलानुसार माहिती बँकेने ८ दिवसांत पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. दि. १४/१०/२०१० रोजी अपीलकर्त्यास माहिती पाठविली. आयोगाच्या आदेशानुसार पुनश्च पाठवीत आहे, असे बँकेचे सरव्यवस्थापक श्री. आर. एल. उत्पात यानी दि. २०/५/२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

तलाठी व मंडल अधिकारी यांच्याशी हातमिळवणी करुन काही लोकांनी कर्जमाफीचा गैरफायदा उठविला आहे. त्यांच्याकडून सव्याज वसुली करावी तसेच जमिनीचा लिलाव करावा, अशा स्वरुपाची अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाची बाब नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दगडू दादू कोरबु
मु. पो. अकलूज, समतानगर, ता. माळशिरस, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०६६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दगडू दादू कोरबु
मु. पो. अकलूज, समतानगर, ता. माळशिरस, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. शैलेश शरद सूर्यवंशी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर श्री. अविनाश दत्तात्रय पुजारी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जमिनीच्या उता-याची मागणी करुनही माहिती अधिकारात ती दिली जात नाही. रितसर अर्ज करुन अभिलेख शाखा, पंढरपूर यांचेकडून उतारे घ्यावेत, असे जन माहिती अधिकारी यानी कळविले.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्याचा दारिद्रय रेषेखालील यादीत समावेश असल्याचा दाखला सादर करण्यास अन्यथा त्याना आवश्यक असलेले शुल्क भरुन माहिती घेण्यास पत्रान्वये कळविले होते. परंतु त्यानी त्यानुसार पूर्तता केली नाही. हीच माहिती तालुका भूमी निरिक्षक, भूमी अभिलेख, पंढरपूर व तहसीलदार, पंढरपूर यांच्याकडून यापूर्वी त्याना मिळाली असून तसा त्यांचा जबाब आहे. सन १९२४ ते १९८५ या काळातील याच जमिनीच्या उता-याची मागणी ते वेळोवेळी करीत आले असून त्या त्या वेळी त्याना माहिती दिली आहे.

जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यांच्या दि. १६/९/२००९ च्या जबाबाची प्रत सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नितीन कृष्णा गव्हाणे
मु. पो. कडलास, ता. सांगोला, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
कै. सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशीय संस्था,
भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग केगांव, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
कै. सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशीय संस्था,
भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग केगांव, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१७५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नितीन कृष्णा गव्हाणे
मु. पो. कडलास, ता. सांगोला, जि. सोलापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

कै. सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशीय संस्था, भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयाकडील विद्यार्थ्यांची अनामत रक्कम व शुल्क याबाबतची माहिती, तसेच सन २००८ ते २०१० या काळात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी मागितली होती. ती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. नितीन कृष्णा गव्हाणे यानी केली.

संबंधित महाविद्यालयाला शासनाचे अनुदान अथवा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वरुपातील अन्य भरीव अर्थसहाय्य मिळत असल्याचा पुरावा अपीलकर्त्यांनी सादर करावा. तसा पुरावा सादर केला तरच संबंधित संस्था माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ मधील कलम (२) च्या तरतुदीनुसार 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते की नाही हे ठरविले जाईल व त्यानुसार माहितीबाबत पुढील कार्यवाही केली जाईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र त्यानुसार अपीलकर्त्यांनी अद्यापपर्यंत पूर्तता केलेली नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास माहितीबाबत स्वारस्य नसल्याचे दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय दिनकर मगर
व श्री. धर्मराज देवबा साठे मु. मगराचे निमगांव,
ता. माळशिरस, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मगराचे निमगांव, ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८९०/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि ११/५/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,<br>पंचायत समिती माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री.एस.जे.नागटिळक<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत मगराचे निमगांव, ता. माळशिरस,<br>जि. सोलापूर श्री.राजेंद्र भगवान खरात | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संजय दिनकर मगर यानी दि. १९/७/२०१० च्या पत्रान्वये २००० ते २००२ या कालावधीमधील माहिती मागितली होती. दप्तरी उपलब्ध असलेली माहिती दि. १७/८/२०१० रोजी दिली. ऊर्वरित माहितीबाबतचे दप्तर तत्कालीन ग्रामसेवक श्री. आर.बी.चव्हाण यानी पदभार मला दिलेला नसल्यामुळे ती माहिती देता येत नाही, असे कळविले,असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मगराचे निमगांव, ता.माळशिरस, जि. सोलापूर श्री.राजेंद्र भगवान खरात यानी केले.

तत्कालीन ग्रामसेवक श्री. आर.बी.चव्हाण यानी दप्तर पदभार विद्यमान जन माहिती अधिकारी याना न देणे हा सार्वजनिक अभिलेख उपलब्ध होण्यापासून नागरिकांना वंचित ठेवण्याचा प्रकार आहे. अपिलीय प्राधिकारी यानी या संदर्भात चौकशी करुन एका आठवडयात अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र असा अहवाल आयोगाला अद्याप प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे. माहितीबाबत जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही रास्त आहे. तत्कालीन ग्रामसेवकाकडून कागदपत्रे मिळविण्याबाबत त्यानी प्रयत्न केले असल्याचेही कागदपत्रांवरुन दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन ग्रामसेवकाच्या पदभाराबाबतच्या खुलाशासह व आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती माळशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री.एस.जे.नागटिळक यानी दि.२०/८/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. तसे न केल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शहाबुद्दीन अजमुद्दीन मुलाणी
मु.पो.केम, ता.करमाळा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, आश्रमशाळा केम, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८४० / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.शहाबुद्दीन अजमुद्दीन मुलाणी<br>मु.पो.केम, ता.करमाळा, जि.सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर<br>प्रतिनिधी श्री.एस.एस.कलशेट्टी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, आश्रमशाळा केम, ता.करमाळा, जि.सोलापूर<br>श्री.देवीदास गोपाळ यादव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : श्री विठ्ठल देवस्थान ट्रस्ट, केम संचलित शासनमान्य बालकाश्रमाबाबतची माहिती विलंबाने दिली. जन माहिती अधिकाऱ्यानी मुदतीत अर्ज वर्ग केला नाही आणि अपिलीय प्राधिकाऱ्यानी अपिलाचा निर्णय दिला नाही. माझी बहीण त्या शाळेत शिक्षिका असून गेली १२-१३ वर्षे तिचे व संस्थेचे वाद आहेत. न्यायालयीन कामासाठी माहिती हवी होती, म्हणून मुख्याध्यापकांनी ती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : मी प्रभारी मुख्याध्यापक असून माझ्याकडे प्राथमिक आश्रमशाळेचा पदभार असून बालकाश्रमाची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही, हे अपीलकर्त्यांना कळविले होते. अपिलीय प्राधिकाऱ्यानी दिलेल्या सूचनेप्रमाणे अर्ज हस्तांतरित केल्यामुळे बालकाश्रमाने माहिती दिली. बालकाश्रमाची माहिती कोणाकडे मागावी, हे माहीत असूनही अपीलकर्त्यांनी माझ्याकडे अर्ज केला.

अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी : अपीलकर्ता यानी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडेच माहितीची मागणी केली पाहिजे, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

अपीलकर्ता यानी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडेच-बालकाश्रमाकडेच माहिती मागणे आवश्यक होते. मात्र माहिती नेमकेपणाने कोणाकडे मागावी हे अर्जदारास माहीत नसते. जन माहिती अधिकाऱ्यानीच अर्ज प्राधिकरणाकडे वर्ग करणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आश्रमशाळा केम, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.देवीदास गोपाळ यादव याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शाम मधुकर केवटे
रा. १६३/१, शुक्रवार पेठ, योगीराज कॉर्नर,
शिंदे आळी, पुणे ४११ ००२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहा. वनसंरक्षक,
पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. शाम मधुकर केवटे
रा. १६३/१, शुक्रवार पेठ, योगीराज कॉर्नर, शिंदे आळी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. नागेश आनंदराव शिंदे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - नांदोशी, तालुका हवेली, जि. पुणे येथील वन विभागाकडून आरक्षित केलेल्या गट क्रमांकाच्या संदर्भात दि. १९/३/२०१० च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १६/१२/२०१० रोजी माहिती दिली. ती समाधानकारक नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांचा अर्ज दि. ३१/३/२०१० रोजी प्राप्त झाला. तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी माहिती पौड वन परिक्षेत्राच्या कक्षेतील असल्यामुळे दि. १/४/२०१० रोजी अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. परंतु माहिती त्यांच्याकडे नसल्यामुळे वन क्षेत्रपाल, पुणे यांच्याकडे अर्ज पाठविला. त्यांच्याकडून दि. ७/७/२०१० रोजी माहिती प्राप्त झाली. अपीलकर्त्यांना ती दि. १६/१२/२०१० रोजी पाठविली गेली. अपिलीय प्राधिकारी तथा सहा. वनसंरक्षक, पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. पी. बी. भालेकर यानी प्रथम अपिलावर निर्णय दिलेला नाही.

अर्ज केल्यापासून सुमारे ९ महिन्यांनी अपीलकर्त्यांस माहिती देण्यात आली असल्याचे दिसते. या विलंबाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बी. एन. कदम यांचा लेखी खुलासा शास्तीच्या म्हणण्यासह आयोगाला सादर करावा. अपीलकर्त्यास हव्या असलेल्या नियमाची प्रत नि:शुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. प्रथम अपिलावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार विहित मुदतीत निर्णय देणे आवश्यक असल्याची समज अपिलीय प्राधिकारी श्री. पी. बी. भालेकर याना देण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बी.एन.कदम यानी दि. ४/२/२०११ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला.

श्री. शाम मधुकर केवटे यांचा दि. १९/३/२०१० रोजीचा अर्ज माहिती अधिकार या कक्षास दि. ३१/३/२०१० रोजी प्राप्त झाला. पुढील कार्यवाहीसाठी तो वनपरिक्षेत्र अधिकारी, पौड याना दि.१/४/२०१० रोजी पाठवून माहिती अधिकारी यानी योग्य वेळी पुढील कार्यवाही सुरु केलेली होती.

परंतु अर्जदारांना पाहिजे असलेली माहिती वनक्षेत्रपाल, पौड यांचे कार्यालयात उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे सदरची माहिती वनक्षेत्रपाल, पुणे यांच्या कार्यालयात असल्याचे माहिती अधिकारी याना समजलेवरुन सदरील अर्ज वनक्षेत्रपाल, पुणे यांच्याकडून अर्जदारास माहिती उपलब्ध करुन घेण्यास कळविले होते. वनक्षेत्रपाल, पुणे यानी अर्जदारास माहिती न देता या कार्यालयास माहिती पाठविण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरची माहिती अर्जदारापर्यंत पोहचण्यास/मिळण्यास उशीर झ ालेला आहे.

अर्जदाराने मागितलेली माहिती ही दुसऱ्या कार्यालयाची असल्यामुळे त्या कार्यालयातून उपलब्ध करुन देण्यास काही कालावधी लागलेला आहे. त्यामुळे जाणूनबुजून दिरंगाई झालेली नाही. अर्जदार श्री. शाम मधुकर केवटे यानी वनक्षेत्रपाल, पुणे यांच्या कार्यालयास परस्पर अर्ज करुन माहिती मागितली असती तर वेळीच त्याना उपलब्ध झाली असती, असे तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यानी खुलाशात म्हटले आहे.

वरील खुलासा समर्थनीय नाही. वनक्षेत्रपाल, पुणे यानी दि. ७/७/२०१० रोजी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविली होती, हे त्यात नमूद केलेले नाही. तसेच दि. ७/७/२०१० ते दि. १६/१२/२०१० या विलंबाचा कोणताही खुलासा त्यानी केलेला नाही. 'अपीलकर्त्यांनी माहिती वनक्षेत्रपाल, पुणे यांचे कार्यालयाला परस्पर अर्ज करुन मागविण्यास हवी होती', असे खुलाशातील त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्यांनी स्वतःच पौड कार्यालयाकडे आधी अर्ज पाठविला व नंतर वनक्षेत्रपाल, पुणे या कार्यालयाकडे पाठविला. यावरुन माहिती नेमकी कोठे आहे, हे त्याना स्वतःलाही माहीत नव्हते, असे दिसते. या स्थितीत सामान्य नागरिकाला ते माहिती असण्याची अपेक्षा करणे अवाजवी आहे. या बाबी लक्षात घेता दि. ७/७/२०१० ते दि. १६/१२/२०१० या विलंबाच्या कालावधीसाठी ते शास्तीस पात्र ठरतात.

अपीलकर्त्यांच्या मागणीत आता केलेल्या कार्यवाहीबरोबरच संभाव्य कार्यवाहीचीही विचारणा आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार दि.२५/१/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास ऊर्वरित माहिती पाठविण्यात आल्याचे मुख्य लेखापाल श्री. नागेश आनंदराव शिंदे यानी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, पुणे विभाग, पुणे श्री. बी.एन. कदम यानी माहिती-मागणीचा अर्ज वर्ग करण्याची कार्यवाही विहित मुदतीत केली असली, तरी प्राप्त झालेली माहिती अपीलकर्त्यास त्वरित पुरविण्याची दक्षता न घेतल्यामुळे दि. ७/७/२०१० ते दि. १६/१२/२०१० या विलंबाच्या कालावधीस ते जबाबदार ठरतात. दि. ७/७/२०१० ते दि. १६/१२/२०१० एकूण १६३ दिवसांच्या विलंबाबद्दल (१६३ x २५०) ४०,७५०/- शास्ती होते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार कमाल शास्ती रु. २५,०००/- पर्यंतच होऊ शकते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बी. एन. कदम याना रु. २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक, पुणे श्री. बी. एन. कदम यांच्या ऑगस्ट २०११, सप्टेंबर २०११, ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११ व डिसेंबर २०११ च्या अनुक्रमे सप्टेंबर २०११, ऑक्टोंबर २०११, नोव्हेंबर २०११, डिसेंबर २०११ व जानेवारी २०१२ मध्ये देय असलेल्या वेतनातून पाच समान हप्त्यात कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा सहा. वनसंरक्षक, पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आबासाहेब तुकाराम चव्हाण
मु.पो.खंडेराजुरी, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, मिरज, ता.मिरज, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खंडेराजुरी, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५७९ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आबासाहेब तुकाराम चव्हाण
मु.पो.खंडेराजुरी, ता.मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मिरज,
ता.मिरज, जि.सांगली श्री.ज्ञानेश्वर रामचंद्र गुरव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खंडेराजुरी, ता.मिरज, जि.सांगली
श्री.सुरेश सोमा कवर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : खंडेराजुरी गावाच्या ग्रामसभेतील व ग्रामपंचायतीच्या मासिक सभैच्या तीन महिन्याच्या ठरावांच्या प्रती मागितल्या होत्या. जन माहिती अधिकारी यानी त्या विहित मुदतीत पुरविल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यानी दि.२२.८.२०१० च्या अर्जान्वये माहिती मागितली. त्या काळात आईच्या आजारपणामुळे मी रजेवर असल्यामुळे मुदतीत माहिती देऊ शकलो नाही. अपिलीय प्राधिकारी यानी दि.३०.९.२०१० रोजी आदेश दिले. परंतु वरील व अन्य घरगुती कारणांमुळे माहिती देता आली नाही. दि.२०.६.२०११ रोजी ग्रामपंचायतीच्या लिपिकासह माहिती देण्यासाठी गेलो असता त्यानी घेतली नाही. दि.२५.६.२०११ रोजी टपालाने पाठविली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी मर्यादित स्वरूपाची व नेमकेपणाने माहिती मागितली आहे. कौटुंबिक कारणामुळे व रजेमुळे जन माहिती अधिकारी विहित मुदतीत माहिती देऊ शकले नाहीत, हे गृहित धरले तरी मूळ अर्जापासून सुमोर दहा महिने-म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये दिलेल्या तीस दिवसांच्या मुदतीपेक्षा नऊ महिने विलंबाने माहिती दिली आहे. त्यानी नमूद केलेल्या कारणांमुळे काही कालावधी क्षमापित करणे मान्य केले तरी विलंब समर्थनीय ठरत नाही. त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खंडेराजुरी, ता.मिरज, जि.सांगली श्री.सुरेश सोमा कवर यानी नऊ महिने विलंबाने माहिती दिली असल्यामुळे त्याना रूपये २५०००/- शास्ती करण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री.सुरेश सोमा कवर यांना सप्टेंबर २०११, ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११, डिसेंबर २०११ व जानेवारी २०१२ या

महिन्यात मिळणाऱ्या ऑगस्ट २०११, सप्टेंबर २०११, ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११ व डिसेंबर २०११ या महिन्याच्या पगारातून अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, मिरज, ता.मिरज, जि.सांगली यानी वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत जगन्नाथ घोडके
मु.पो.होटगी, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर ... अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, ग्रामीण विभाग, सोलापूर ... उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, ग्रामीण उपविभाग क्र.२, दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.चंद्रकांत जगन्नाथ घोडके<br>मु.पो.होटगी, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ग्रामीण उपविभाग क्र.२, दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.चंद्रकांत जनार्दन दिघे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : वडिलांच्या नावे विज जोड असताना भरलेल्या बिलाची संगणकात नोंद होत नव्हती. बिल जास्त येत असल्याची तक्रार करूनही मीटर दुरूस्तीला पाच वर्षे लागली. म्हणून पाच वर्षांच्या बिलांबाबतची माहिती मागितली होती. भरलेल्या बिलांच्या पावतीची त्यात नोंद नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याकडील पैसे भरल्याच्या पावत्या मागितल्या त्या त्यानी दिल्या नाहीत. माहिती तयार करून दिली होती. परंतु जावक लिपिक श्री.एन.आर.छत्रे यानी ती वेळीच न पाठविल्यामुळे दहा दिवस विलंब झाला.

अपीलकर्ता यांची मूळ तक्रार लक्षात घेता बिल भरल्याच्या पावत्यांच्या प्रती त्यानी जन माहिती अधिकारी याना देणे आवश्यक आहे. मात्र तयार असलेली माहिती विहित मुदतीत न पाठविण्यास झालेल्या विलंबाला जबाबदार असणारे जावक लिपिक श्री.एन.आर.छत्रे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास माहिती देण्यास दहा दिवस विलंब झाल्याबद्दल जावक लिपिक श्री.एन.आर.छत्रे याना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार प्रतिदिन रूपये २५०/- प्रमाणे रूपये २५००/- शास्ती करण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ग्रामीण उपविभाग क्र.२, दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर यानी शास्तीची रक्कम श्री.एन.आर.छत्रे यांना सप्टेंबर २०११ या महिन्यात मिळणाऱ्या ऑगस्ट २०११ या महिन्याच्या पगारातून वसूल करावी व '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजयकुमार कल्लाप्पा जाधव
धनश्री अपार्टमेंट, विरशैव माळी मंगल कार्यालयाजवळ,
लक्ष्मी देऊळ रोड, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगररचनाकार, मिरज विभाग,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५०५ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजयकुमार कल्लाप्पा जाधव
धनश्री अपार्टमेंट, विरशैव माळी मंगल कार्यालयाजवळ, लक्ष्मी देऊळ रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका, सांगली प्रतिनिधी श्री.जे.व्ही.नाईक

**जन माहिती अधिकारी** तथा नगररचनाकार, मिरज विभाग, सांगली, मिरज
आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री.राजकुमार दिगंबर मठपती

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : अतिक्रमण काढण्याची मागणी करणारा अर्ज डिसेंबर २००८ मध्ये केला होता. त्यावेळी कारवाईसाठी शुल्क रूपये ५००/- भरूनही त्वरित कारवाई केली नाही व योग्य माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.राजेंद्र व्ही. काकडे यानी अपीलकर्त्यास उत्तर दिले. नियमानुसार संबंधिताना नोटीस देऊन अतिक्रमण काढून घेण्यास सांगितल्याचे दिसते.

तक्रारीनुसार कारवाई न करण्याची कारणे अपीलकर्त्यानी विचारली असून खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि केलेल्या कार्यवाहीची माहिती व तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी संबंधिताना दिलेल्या नोटिशीची प्रत अपीलकर्त्यास पुरविणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अतिक्रमण काढण्याच्या मागणीसाठी अपीलकर्त्यांनी दि.१३.१२.२००८ रोजी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती संबंधित पत्राच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, मिरज विभाग, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यानी निःशुल्क पुरवावी व दि.२०.८.२०११ पर्यंत आयोगाला अनुपालन अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय धोंडीराम काळे
मु. पो. वडळे, ता. फलटण, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
ता. फलटण, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी,
ता. फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/११/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. दत्तात्रय धोंडीराम काळे
मु. पो. वडळे, ता. फलटण, जि. सातारा

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
ता. फलटण, जि. सातारा श्री. शिरीष दत्तात्रय भुंजे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,

| | |
|---|---|
| | ता. फलटण, जि. सातारा श्री. नितीन वसंत फुलसुंदर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- संपूर्ण फलटण तालुक्यातील गतिमान पाणलोट विकास योजनेतील सर्व कामांबाबतची सन २००७ ते २००९ या कालावधीतील माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांनी 'माहिती देण्यास विलंब लागेल' एवढेच एक पत्र दिले. बाकी काहीही मिळाले नाही. जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी व माहिती मिळावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांचा अर्ज दि. १६/९/२००९ रोजी प्राप्त झाला. आमच्या कार्यालयाबरोबरच फलटण, तरडगांव, विडणी व बरक या ४ मंडल कृषी अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील विस्तृत माहितीची मागणी त्यात होती. दि. ३/१०/२००९ च्या पत्रान्वये या ४ मंडल अधिकाऱ्यांकडे अर्ज वर्ग करुन माहिती देण्याबाबत कळविले. याच दरम्यान विधानसभा निवडणुकीचे कामकाज चालू असल्यामुळे मी व संबंधित कर्मचारी त्या कामात कार्यरत होतो. निवडणुकीचे कामकाजामुळे व विस्तृत माहिती संकलित करुन देण्यास विलंब लागेल, असे अपीलकर्त्यास दि.५/१०/२००९ च्या पत्रान्वये कळविले. दरम्यान श्री. काळे यानी प्रथम अपील केले. तो पर्यंत मंडल कृषी अधिका-यांकडील माहिती प्राप्त झालेली नव्हती. मात्र आमच्या कार्यालयाच्या स्तरावरील माहिती उपलब्ध करुन देता येईल, असे त्याना कळविले. त्यानुसार दि. ५/११/२००९, दि. २२/१२/२००९, दि. ३१/१२/२००९, दि. २६/१०/२००९, दि. २०/२/२०१०, व २७/१०/२०१० रोजी संबंधित मंडल अधिकाऱ्यांना माहिती देण्याबाबत स्मरणपत्राने कळविले. तसेच विहित मुदतीत माहिती न दिल्यास पुढील कारवाईस ते जबाबदार राहतील, याची जाणीवही दिली. दि. ८/११/२०१० रोजी त्यांच्याकडून बव्हंश माहिती प्राप्त झाली.

विद्यमान जन माहिती अधिकारी - मंडल कृषी अधिकाऱ्यांकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपीलकर्त्यांना अद्याप माहिती देता आलेली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास व संबंधित मंडल कृषी अधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रांची प्रत व या पत्रांच्या जावक बारनिशीतील नोंदींच्या छायांकित प्रती विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, ता. फलटण, जि. सातारा श्री. शिरीष दत्तात्रय भुंजे यानी सादर कराव्यात. तसेच १) श्री. तुकाराम भगवान शेंडगे, मंडल कृषी अधिकारी, फलटण २) श्री. अनिल गणपत धुरगुडे, मंडल कृषी अधिकारी, तरडगांव ३) कु. प्रज्योती सोपानराव बिचुकले, मंडल कृषी अधिकारी, विडणी व ४) श्री. हनुमंत गंगाराम गावडे, मंडल कृषी अधिकारी, बरड यांच्याकडून विलंबाबाबतचा खुलासा शास्तीविषयीच्या म्हणण्यासह प्राप्त करुन ८ दिवसांत सादर करावा. संकलित केलेली माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र अपीलकर्त्यांनी संपूर्ण तालुक्याची अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती ढोबळमानाने मागितली आहे. एकूण ५ कार्यालयांकडून ती संकलित करुन देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर वस्तुतः बंधनकारक नाही. वास्तविक त्या त्या कार्यालयामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी असल्यामुळे अपीलकर्त्यांनी त्या त्या कार्यालयाकडून माहिती मागणे आवश्यक आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी श्री. शिरीष दत्तात्रय भुंजे यानी अपीलकर्त्यास दि. १८/११/२०१० रोजी माहिती पाठविल्याचे दि. १९/११/२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. तसेच १) श्री. तुकाराम भगवान शेंडगे, मंडल कृषी अधिकारी, फलटण यानी दि. १५/११/२०१० २) श्री. अनिल गणपत धुरगुडे, मंडल कृषी अधिकारी, तरडगांव यानी दि. १६/११/२०१० ३) कु. प्रज्योती सोपानराव बिचुकले, मंडल कृषी अधिकारी, विडणी यानी दि. १५/११/२०१० व ४) श्री. हनुमंत गंगाराम गावडे, मंडल कृषी अधिकारी, बरड यानी दि. १५/११/२०१० रोजी माहितीबाबत झालेल्या विलंबाविषयी खुलासा सादर केला. कार्यालयीन कामाचा ताण, अपुरा कर्मचारी वर्ग, अतिरिक्त कार्यभार, अतिवृष्टीसारख्या आपत्तीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीविषयीचे कामकाज अशी कारणे व वैयक्तिक आजारपण आदि अडचणींचा तपशील त्यांनी खुलाशात दिला आहे. परंतु अपीलकर्त्यांचा अर्ज दि. १६/९/२००९ चा असून माहिती दि. १८/११/२०१० रोजी देण्यात आली आहे. म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या ३० दिवसांच्या मुदतीपेक्षा सुमारे १३ महिने विलंबाने माहिती दिली आहे. विधानसभा निवडणुकीचे कामकाज व अन्य सर्व अडचणी लक्षात घेतल्या तरी एवढा विलंब समर्थनीय ठरत नाही. माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ (४, ५) अन्वये जन माहिती अधिकारी माहितीसाठी ज्यांचे सहाय्य मागेल व माहिती ज्यांच्या कक्षेतील असेल त्यांना लेखी कळविल्यास ते मानीव जन माहिती अधिकारी ठरतात. त्यानुसार उपरोक्त चारही मंडल कृषी अधिकारी जन माहिती अधिकारी ठरत असून ते विलंबास जबाबदार व म्हणून शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील विहित मुदतीपेक्षा सुमारे १३ महिने विलंबाने माहिती दिल्यामुळे १) श्री. तुकाराम भगवान शेंडगे, मंडल कृषी अधिकारी, फलटण २) श्री. अनिल गणपत धुरगुडे, मंडल कृषी अधिकारी, तरडगांव ३) कु. प्रज्योती सोपानराव बिचुकले, मंडल कृषी अधिकारी, विडणी व ४) श्री. हनुमंत गंगाराम गावडे, मंडल कृषी अधिकारी, बरड यांना (४२९ दिवसांच्या विलंबासाठी) एकूण रु. २५,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम १) श्री. तुकाराम भगवान शेंडगे, मंडल कृषी अधिकारी, फलटण २) श्री. अनिल गणपत धुरगुडे, मंडल कृषी अधिकारी, तरडगांव ३) कु. प्रज्योती सोपानराव बिचुकले, मंडल कृषी अधिकारी, विडणी व ४) श्री. हनुमंत गंगाराम गावडे, मंडल कृषी अधिकारी, बरड यांच्या ऑगस्ट २०११ च्या अनुक्रमे सप्टेंबर २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून प्रत्येकी रु. ६२५०/- ची कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, फलटण, जि. सातारा यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. जालिंदर महादेव चंदनशिवे
मु. पो. पाकणी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
मु. पो. पाकणी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३५/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. जालिंदर महादेव चंदनशिवे
मु. पो. पाकणी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर श्री. एस.एस.खरबस

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
मु. पो. पाकणी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर श्री. एस. एम. म्हेत्रे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - मौजे पाकणी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर या ग्रामपंचायतीचे सन २००७- पासूनचे ठराव, करंट अकौंट, हिशेबाच्या नोंदी, सन २००३ पासूनची कामाची व मागासवर्गीय शेष निधी-बाबतची कार्यवाही या सर्व बाबतची सविस्तर माहिती मागितली होती. ती अपुरी दिली. शुल्काची मागणी जन माहिती अधिकारी यानी केली नसल्यामुळे शुल्क भरले नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> -अपीलकर्त्यांनी सन २००७ पासूनची अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती संकलित करुन मागितली होती. माझ्याकडे दोन ग्रामपंचायतींचा पदभार असल्यामुळे व एवढी विस्तृत माहिती संकलित करण्यासाठी अधिक कालावधी लागणार असल्यामुळे उपलब्ध माहिती घेऊन जाण्याबाबत अपीलकर्त्यास समक्ष कळविले होते. काही माहिती संकलित करुन दिली. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी व सुनावणीनंतर आणखी काही माहिती दिली. अजून माहिती हवी असल्यास त्वरित पूर्तता करीन.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> - अपीलकर्ता ग्रामपंचायतीशेजारीच रहात असल्यामुळे जन माहिती अधिकारी यानी त्याना तोंडी कळविले. ऊर्वरित माहिती अपिलाच्या सुनावणीनंतर दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (९) अन्वये अशी माहिती नाकारता येते. परंतु तसे न करता जन माहिती अधिकारी यानी संकलित करुन माहिती दिली आहे व ७४१ पृष्ठांची ऊर्वरित माहिती सादर केली आहे. त्यानी केलेली कार्यवाही व विलंबाबाबतचे त्यांचे स्पष्टीकरण लक्षात घेता विलंबाचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे.

सुनावणीच्या वेळी सादर केलेली माहिती अपीलकर्त्यास दोन दिवसांत निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी यानी दि. १२/५/२०११ च्या पत्रान्वये स्पीड पोस्टाच्या पावतीसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुधाकर दत्तात्रय जोशी
१०/ए-३ राजमयूर(२) सोसायटी, एरंडवणे, पुणे-४११००४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुधाकर दत्तात्रय जोशी
१०/ए-३ राजमयूर(२) सोसायटी, एरंडवणे, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा करआकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.विलास कानडे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख,<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.दयानंद सायबा सोनकांबळे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : श्री.ताराचंद शहा या नावाच्या व्यक्तीच्या मिळकत कराचे बिल माझ्या पत्रपेटीत मला मिळाले. माझ्या माहितीनुसार ही व्यक्ती हयात नसल्यामुळे रूपये ८३७३७/- ही थकबाकी वसूल करण्यासाठी काय प्रयत्न केले, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. परंतु त्यानी चुकीची माहिती दिली. म्हणून प्रथम अपील केले असता सविस्तर माहिती देण्याचे चुकीचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. करपात्र किंमत ठरवून वसुली करतो, असे त्यानी कळविले. परंतु सन १९९३ पासून वसुलीसाठी काय केले, हे सागितले नाही. अपिलाच्या निर्णयानंतर ही थकबाकी वसूल केली. महानगरपालिकेची एवढी रक्कम वसूल करून दिल्याबद्दल, खरे म्हणजे, मला बक्षिस दिले पाहिजे.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याच्या अर्जानुसार केलेल्या कार्यवाहीची व एकूण रूपये ८३७३७ वसुलीबाबत नोटीस पाठविल्याची, तसेच वसुलीसाठी अवलंबिलेल्या उपायांची माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार संबंधित प्रकरणातील कागदपत्रांच्या प्रती दिल्या. तसेच या मिळकतीवर दि.३१.३.२०१० अखेर असलेली थकबाकी रूपये ८४,३०५/- मिळकत धारकाकडून दि.१८.१.२०१० रोजी वसूल केली. तसे अपीलकर्त्याना कळविले.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> : मिळकत कर वसूल करणे हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे. श्री.जोशी यानी त्याबाबत महानगरपालिकेला कळविणे हा सहकार्याचा भाग असल्याची महानगरपालिकेला जाणीव आहे.

'एक जागरूक नागरिक म्हणून मी माझे कर्तव्य केले. परंतु वसुलीनंतर एक वर्षाने मला त्याबाबत कळविले गेले, हे खेदजनक आहे. महानगरपालिकेचे अधिकारी अशा विषयांबाबत अधिक संवेदनशील झाले तर लोक मदतीसाठी पुढे येतील,' असे श्री.जोशी यानी आयोगाला सादर केलेल्या दि.२३.१.२०११ च्या निवेदनात म्हटले असून बक्षिसाची रक्कम मिळावी, अशी मागणी केली आहे. त्यांची भावना समजण्यासारखी असली तरी करवसुली व बक्षिस देणे-न देणे हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गोरक्ष विजयकुमार जाधव
२११९ न्हावी गल्ली, मंगळवेढा, मु.पो.ता.मंगळवेढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा,
मु.ता.पडोळकरवाडी, पो.हन्नूर, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोरक्ष विजयकुमार जाधव
२११९ न्हावी गल्ली, मंगळवेढा, मु.पो.ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सोलापूर प्रतिनिधी श्री.एस.एस.कलशेट्टी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा, मु.ता.पडोळकरवाडी,
पो.हन्नूर, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.राजेंद्र वासुदेव पोतदार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : माहिती मागणारा अर्ज दि.४.३.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने पाठविला होता. परंतु जन माहिती अधिकारी यानी रजिस्टर स्वीकारले नाही, म्हणून दि.२२.३.२०१० रोजी प्रथम अपील केले. माध्यमिक आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांकडे माहित मागितली असताना प्राथमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक हजर होते. तरीही अपिलीय प्राधिकाऱ्यानी सुनावणी का घेतली, हे कळले नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : अपीलकर्त्याचे रजिस्टर नाकारलेले नाही. दि.३.११.२०१० ला त्यांचा अर्ज आला. त्यानुसार माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांकडील सुनावणीला उपस्थित राहून मी अर्ज आला नसल्याचे सांगितले होते. त्यांच्या आदेशाप्रमाणे अपीलकर्त्याकडून अर्ज घेऊन दि.२३.११.२०१० रोजी पुन्हा माहिती दिली.

<u>अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी</u> : अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती मूळ अर्जानुसार देण्याचे आदेश अपिलाच्या निर्णयात दिले होते.

अपीलकर्ता यानी नेमकेपणाने माहिती मागणे आवश्यक असून त्यानी अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी याना सादर करावी व त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी आठ दिवसात अपीलकर्त्यास माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी  श्री.राजेंद्र पोतदार यांची संस्थेच्या अन्य शाखेत बदली झाली असून माहिती-मागणीच्या अर्जाची प्रत त्याना पाठविली. माहिती पडोळकरवाडी, पो.हन्नूर, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर येथील शाळेकडून घेण्याबाबत कळविले. परंतु त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी आपण माहिती अधिकारी नसल्याचे त्यानी कळविले व माहिती श्री.पोतदार यांच्याकडूनच उपलब्ध करून घ्यावी, असे सांगितले. यावरून श्री.पोतदार मला माहिती मिळूच नये, म्हणून प्रयत्न करीत आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता यानी दि.२५.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली आहे. वस्तुतः अपीलकर्ता यानी माहिती मागणीच्या अर्जाची प्रत श्री.पोतदार

यांच्याकडे न पाठविता विद्यमान जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक होते. तथापि या विषयात उभय बाजूंनी केलेल्या कार्यवाहीची चौकशी होणे आवश्यक दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.गोरक्ष विजयकुमार जाधव यांचा माहिती-मागणीचा अर्ज व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रमशाळा, मु.ता.पडोळकरवाडी, पो.हन्नूर, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर यानी केलेली कार्यवाही या संदर्भात अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यानी चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल आयोगाला १५ दिवसात सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, डी-वॉर्ड(पाठीमागची बाजू),
घर नं.२६४६, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४४९ / २००९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, डी-वॉर्ड(पाठीमागची बाजू),
घर नं.२६४६, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, जि.सांगली
प्रतिनिधी श्री.ए.के.नानगुरे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, जि.सांगली
डॉ.अशोक मारूती सुतार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : वाळवा पंचायत समितीच्या कक्षेतील प्राथमिक आरोग्य केंद्रांबाबतची माहिती मागितली होती. दोन केंद्रानी माहिती दिली. कोणती माहिती हवी आहे, हे कळवूनही तीन केंद्रांनी अद्याप माहिती दिली नाही. नेमून दिलेल्या ठिकाणी डॉक्टर रहात नाहीत. त्यामुळे जनतेला आरोग्य-सेवा योग्य प्रकारे मिळत नाही व लोकांना खाजगी दवाखान्यात जावे लागते. आरोग्य कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री.कुंभार यांच्या मताप्रमाणे व त्यांच्या मर्जीनुसार कामे चालतात. आम्ही पुराव्यानुसार व नियमाप्रमाणे काम होत नाही हे दाखविले तर आरोग्य अधिकाऱ्यानी स्वखुशीने सेवानिवृत्ती घेण्यास तयार रहावे. माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई करून माहिती नि:शुल्क मिळावी.

अशाच आशयाचे लेखी निवेदनही श्री.कापसे यानी सादर केले.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता श्री.शिवाजी आनंदा कापसे यांचा माहिती-मागणी अर्ज दि.१६.१.२००९ रोजी प्राप्त झाला. सहा प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्याच दिवशी त्याच्या प्रती पाठविल्या. त्यांच्याकडून प्राप्त झालेली सर्व एकत्रित माहिती समक्ष प्राप्त करून घेण्याबाबत दि.१२.२.२००९ च्या पत्रान्वये कळविले. ते न आल्यामुळे माहिती रजिस्टर्ड टपालाने पाठविली. परंतु अपुरी माहिती मिळाल्याच्या कारणावरून त्यानी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले. अपुरी अगर न मिळालेली माहिती कोणती, याची यादी श्री.कापसे यानी द्यावी व त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती पुरवावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, जि.सांगली डॉ.ए.पी.वाघमारे यानी दि.११.५.२००९ रोजी दिले. दि.२२.५.२००९ पर्यंत श्री.कापसे यानी तशी यादी न दिल्यामुळे दि.२२.५.२००९ रोजी

त्याबाबत मागणी करणारे पत्र त्याना पाठविले. माहिती पुरविण्याबाबत सर्व कार्यवाही केली असून सर्व माहिती त्याना दिली आहे.

नागरिकांना आरोग्य सेवा मिळण्याबाबत अपीलकर्त्यानी व्यक्त केलेली आस्था लक्षात घेतली, तरी त्यांची त्याबाबतची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा विषय नाही. 'पाचवा व सहावा वेतन आयोगामार्फत किती पगार वाढला व कोणकोणते फायदे झाले याची सविस्तर माहिती मिळावी,' 'स्वच्छ, पारदर्शक व भ्रष्टाचारविरहित काम करण्यासाठी आपणाकडून विशेष कोणकोणते प्रयत्न केले जाणार आहेत याची सविस्तर माहिती मिळावी,' अशा स्वरूपाच्या मागण्या अपीलकर्त्यानी केल्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम (२) मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. तसेच 'आज रोजी मला पहिले अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी याना माहिती दाखवली व आवश्यक माहिती दिली. त्यामुळे संदर्भीय अपिलामध्ये नमूद केलेली सर्व माहिती मला मिळाली असलेने माझी कोणतीही तक्रार नाही,'असे लेखी निवेदन अपीलकर्ता यानी दि.२.४.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला दिले असून माहिती मिळाल्याची तक्रार दि.७.४.२०११ रोजी सुनावणीच्या वेळी त्यानी करावी, हे आश्चर्यकारक आहे. तथापि संकलित केलेली माहिती अपीलकर्ता याना रजिस्टर्ड टपालाने पुन्हा पाठवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे दि.८.४.२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली, जि.सांगली डॉ.अशोक मारूती सुतार यानी संबंधित माहिती व या प्रकरणातील सर्व पत्रव्यवहाराच्या प्रतींसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २९ जुलै २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव गजानन गायकवाड
नवीन वसाहत, मु.पो. व ता.खानापूर, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, खानापूर(विटा), ता.खानापूर, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेविका, ग्रामपंचायत गोरेवाडी,
पो.ऐनवाडी, ता.खानापूर, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२४ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.३.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महादेव गजानन गायकवाड
नवीन वसाहत, मु.पो. व ता.खानापूर, जि.सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेविका, ग्रामपंचायत गोरेवाडी,
पो.ऐनवाडी, ता.खानापूर, जि.सांगली श्रीमती सारिका भिमराव शिलवंत

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता व विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : गोरेवाडी, ता.खानापूर, जि.सांगली येथील ग्रामपंचायतीच्या 'जानेवारी २००२ ते आजअखेर' झालेल्या सभांमधील ठराव, लेखा परीक्षण अहवाल, 'सन २००७ ते आजअखेर' मृत्यू पावलेल्यांचे मृत्यू दाखले इ. माहिती मागितली होती. ग्रामपंचायतीत अनागोंदी कारभार गेल्या काही वर्षांपासून चालू आहे. ग्रामपंचायतीच्या सभा व ग्रामसभाही घेतल्या जात नाहीत. आठ वर्षांचे लेखापरीक्षण झालेले नाही. मृत व्यक्तींच्या नावाने अनुदान काढले जाते. शौचालय योजनेत लाखो रूपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. हा भ्रष्टाचार बाहेर यावा म्हणून सर्व माहिती मिळणे आवश्यक आहे. परंतु कोणतीही माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी : ऑगस्ट २००९ मध्ये मी पदभार स्वीकारला असून सन २००२-पासून ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण झालेले नाही. दप्तरी पदभार मिळालेल्या सर्व कामांची माहिती देण्यासाठी गेलो असता अपीलकर्त्यांनी स्वीकारली नाही. उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे दाखविण्याची तयारी आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी : मी वैद्यकीय रजेवर होतो. यशवंत योजनेच्या दप्तराचा पदभार दिला नव्हता.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरूपाची आहे. परंतु, वस्तुतः संबंधित सर्व माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये सर्व नागरिकांसाठी सदैव उपलब्ध असणे आवश्यक आहे. अपीलकर्त्यांना तिचे अवलोकन करून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती सशुल्क घेता येतील. तथापि त्याना हव्या असलेल्या माहितीचे शुल्क त्वरित कळवून जन माहिती अधिकारी यानी एका आठवड्यात माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.१८.३.२०११ च्या पत्रान्वये शुल्काबाबत कळविल्याचे जन माहिती अधिकारी यानी आयोगास अवगत केले. माहितीबाबत केलेल्या पुढील कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी

तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, खानापूर(विटा), ता.खानापूर, जि.सांगली श्री.विष्णू गणपती मंडले यानी अद्यापही सादर केलेला नाही. दि.२०.८.२०११ पर्यंत तो सादर न झ ााल्यास ते पुढील कारवाईसाठी पात्र ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजयकुमार भगवानराव उघडे
४१, भारत को-ऑप.हौसिंग सोसायटी, मौलाली चौक, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३००४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.५.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.विजयकुमार भगवानराव उघडे<br>४१, भारत को-ऑप.हौसिंग सोसायटी, मौलाली चौक, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर<br>श्री.आबासाहेब सूर्यवंशी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : सोलापूर शहर व जिल्ह्यामधील सर्व खाजगी व जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांबाबतची, तसेच काही नेमक्या शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी आदींबाबतची माहिती मागितली होती. एकदाही माहिती दिली नाही. उलट जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी अपमानास्पद वागणूक दिली. एका वर्गात ७० मुले बसतात. अध्यापनाचे काम नीट चालत नाही, असे प्रकार असून माहिती दिली जात नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : अपीलकर्ता यानी जिल्ह्यातील सर्व शाळांची माहिती मागितली असून काही शाळांमधील विद्यार्थ्यांचे व पालकांचे नाव-पत्तेही मागितले आहेत. त्यांच्या मुलाच्या प्रवेशाबाबतच्या तक्रारीचा संदर्भ या मागणीला आहे. त्यांचे अर्ज सर्व शाळांकडे वर्ग केले व माहिती देण्यास सांगितले. तसेच त्यांच्या मुलाला मॉडर्न हायस्कूल, सोलापूर या शाळेमध्ये प्रवेश न दिल्याबाबतच्या तक्रारीची चौकशी करण्याचे आदेश प्रशासन अधिकारी, सोलापूर शिक्षण मंडळ, सोलापूर महानगरपालिका यानी दिले होते.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> : अपीलकर्त्यांची तक्रार असलेली शाळा महानगरपालिकेच्या क्षेत्रातील आहे, आमच्या कक्षेतील नाही. त्याना अवमानकारक वागणूक दिलेली नाही. मात्र सर्व शाळांची माहिती संकलित करून देणे शक्य नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता यानी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती ढोबळ मानाने मागितली आहे. सर्व शाळांकडे अर्ज वर्ग करणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही, असे शासनाचे परिपत्रक क्र.केंमाअ-२००८ / प्र.क्र.९३ /०८ / सहा (मा.अ.) दि.६ सप्टेंबर २००८ या परिपत्रकावरून स्पष्ट होते. तसेच विद्यार्थी / विद्यार्थिनी व पालक यांचे निवासी पत्ते आदी तपशील वैयक्तिक स्वरूपाचा असून तो देता कामा नये. नियमावलीसारखी माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध असल्यामुळे ती जन माहिती अधिकाऱ्यांच्याच कक्षेतील मानता येणार नाही व त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २९ जुलै २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामलिंग सिद्राम कवचाळे
मु.पो.बोराळे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पं),
पंचायत समिती, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बोराळे,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९३ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामलिंग सिद्राम कवचाळे
मु.पो.बोराळे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पं), पंचायत समिती, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.राजशेखर महादेव कमळे

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत बोराळे, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.बसवराज भिमशा दहिवाडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सन २००५ ते २०१० या कालावधीत बोराळे ग्रामपंचायतीने केलेल्या कामाची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी कोणतीही माहिती दिली नाही. खर्चाच्या बनावट पावत्यांसारखा प्रकार असल्यामुळे माहिती दिली जात नाही. एकूण पाच अपिले केली आहेत.

जन माहिती अधिकारी : माझ्याकडे दोन ग्रामपंचायतींचा पदभार असून बोराळे या गावाचा अतिरिक्त पदभार आहे. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची व पाच वर्षांच्या कालावधीतील आहे. वेळोवेळी त्यानी मागितलेली माहिती (अपील क्र.१०५२ व १३११) दिली असून अतिरिक्त पदभार, ग्रामपंचायत निवडणूक, अतिक्रमण धारकांचे न्यायालयात असलेले २२ दावे या कारणामुळे माहिती देण्यास विलंब झाला.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्ता श्री.कवचाळे विविध स्वरूपाची माहिती सातत्याने मागतात. आतापर्यंत त्यांच्या १३ अर्जांनुसार माहिती दिली आहे. माहिती मागण्यामागे ब्लॅकमेलिंगचा उद्देश आहे. पूर्वी प्रकल्प संचालकांनी त्यांचा विविध तक्रारींबाबतचा अर्ज निकाली काढल्याचे मूळ प्रकरण असून अपीलकर्ता न्यायालयात गेले आहेत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या विविध अर्जांवर केलेल्या कार्यवाहीचा तपशील, तसेच त्यांच्या तक्रारीवर प्रकल्प संचालकांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची प्रत आदी कागदपत्रे सादर केली.

जन माहिती अधिकारी यानी सादर केलेला लेखी खुलासा व अपिलीय प्राधिकाऱ्यांचे निवेदन लक्षात घेता माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही योग्य असून विलंब क्षमापित करण्यात येत आहे. पाच वर्षांच्या काळात 'कोणत्या योजनेतून कोणकोणती कामे केली,' अशा प्रकारे सरसकट व ढोबळ स्वरूपात माहिती अपीलकर्त्यांनी मागितली आहे. त्याना आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश बापूराव पाटील
मु. पो. श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य).
जिल्हा परिषद, सोलापूर
(अपील क्र. ३०५८/२०१०, ११५०/सोलापूर, १४९४/सोलापूर, ७७४/२००९,
७७५/२००९, ७७६/२००९, ७७७/२००९, ९३४/२०१०, ९५३/२०१०, ९५४/२०१०,
३०५९/२०१०, १०१८/२०११, १०१९/२०११, १०२४/२०११)

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
शाळा समिती, सी.जी.आगाशे ट्रस्ट, २४२, शनिवार पेठ,पुणे - ३०
(अपील क्र. ७७८/२००९)

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य).
जिल्हा परिषद, सोलापूर
( अपील क्र. ३०५८/२०१०/सोलापूर, ११५०/सोलापूर, ७७४/२००९,
७७५/२००९, ७७६/२००९/, ९५३/२०१०, ९५४/२०१०,
१०१८/२०११, १०१९/२०११, १०२४/२०११)

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ
महाविद्यालय, श्रीपूर, ता.माळशिरस जि. सोलापूर
(अपील क्र. १४९४/सोलापूर, ७७७/२००९, ९३४/२०१०, ३०५९/२०१० )

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
शाळा समिती, सी.जी.आगाशे ट्रस्ट, २४२, शनिवार पेठ,पुणे - ३०
(अपील क्र. ७७८/२००९)

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |
| **३. अन्य अपिले -** | ११५०/सोलापूर, ७७४/२००९/सोलापूर, ७७५/२००९/सोलापूर, ७७६/२००९/सोलापूर, ७७७/२००९/सोलापूर, ७७८/२००९/सोलापूर, १४९४/सोलापूर, ९३४/२०१०/सोलापूर, ९५३/२०१०/सोलापूर, ९५४/२०१०/सोलापूर, १०१८/२०११/सोलापूर, १०१९/२०११/सोलापूर, १०२४/२०११/सोलापूर, ३०५९/२०१०/सोलापूर | |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रमेश बापूराव पाटील
मु. पो. श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य).
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.एस.मुजावर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, ता.माळशिरस या विद्यालयात पूर्णवेळ शिक्षकासाठी अपेक्षित कार्यभार उपलब्ध असतानाही आपले पद अर्धवेळ करुन अन्याय केला आहे, अशी अपीलकर्ता श्री. रमेश बापूराव पाटील यांची तक्रार असून याबाबत विविध पातळयांवर ते सातत्याने अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत आले आहेत. या संबंधीच्या त्यांच्या माहिती-मागणी अर्जांची दखल घेऊन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती दिली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. तथापि त्यांच्या कार्यवाहीने समाधान झाले नसल्याचे नमूद करुन श्री. पाटील पुनःपुन्हा अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत असतात. त्यांची तक्रार व मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही, प्रशासकीय कार्यवाहीची आहे, त्याबाबतच्या कार्यवाहीचीही माहिती दिल्याचे संबंधित

संस्थेने, तसेच शिक्षणाधिकारी यानी संबंधित कागदपत्रांत नमूद केले आहे. आयोगाने यापूर्वी त्यांची अपील क्र. ६३ + ६४/२०१०/सोलापूर व अपील क्र. ३४०/२०१०/सोलापूर ही अपिले निकाली काढली आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नसलेल्या त्याच विषयासाठी/मागणीसाठी अशा प्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा वापर करुन सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज आयोगाने यापूर्वी श्री. पाटील याना दिली होती. तरीही त्यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा असा वापर थांबविलेला नाही. त्यांची तक्रार व मागणी पूर्णपणे व्यक्तिगत स्वरुपाची असून त्यात सार्वजनिक हिताचा कोणताही भाग नाही. अशा प्रकारे एकाच व्यक्तीने एकाच विषयासाठी/मागणीसाठी व त्या अनुषंगाने सातत्याने अर्ज व अपिले करण्यामुळे सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती अकारण खर्ची पडते. तसेच आयोगाकडे दाखल होणाऱ्या अपिलांच्या क्रमवारीच्या दृष्टीने अन्य अपीलकर्त्यांना अधिक लांबणीवर पडावे लागते. उक्त अधिनियमाचा लाभ शक्य तितक्या त्वरेने सर्व नागरिकांना मिळावा, या अपेक्षित कार्यवाहीत व्यत्यय आणणारा असा हा वापर असून तो जबाबदार व कायद्याचे गांभीर्य राखणारा म्हणता येणार नाही. तसेच उक्त अधिनियमाच्या मूलभूत उद्दिष्टाशीही असा वापर सुसंगत नाही. म्हणून व्यापक सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अशा वापराला प्रतिबंध करणे आवश्यक आहे.

अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्याचा मार्ग उपलब्ध आहे. अपीलकर्त्यांची वर नमूद केलेली सर्व अपिले निकाली काढण्यात येत असून यापुढेही याच विषयाबाबतची याच स्वरुपाची अपिले त्यानी केल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :-२६ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामगोंडा शिवनिंगप्पा पाटील
शिव-पार्वती सिंधू विहार, साखर कारखाना रोड, जुळे सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती,
दक्षिण सोलापूर, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सेंजवाड,
ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५९६ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामगोंडा शिवनिंगप्पा पाटील
शिव-पार्वती सिंधू विहार, साखर कारखाना रोड, जुळे सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर,
ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.पी.एल.कोळी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सेंजवाड,

| | |
|---|---|
| | ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.डी.व्ही.खोबण |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या बांधकामाबाबत व माझ्या घर जागेच्या संदर्भात माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्ता यानी दि.१५.३.२०१०, दि.१७.३.२०१० व दि.१८.३.२०१० अशा तीन अर्जांद्वारे माहिती मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर दि.२१.६.२०१० रोजी माहिती टपालाने पाठविली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सेंजवाड, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.मदन कांबळे यानी माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत शास्तीविषयक म्हणण्यासह खुलासा करावा व अपिलीय प्राधिकारी यानी हा खुलासा प्राप्त करून घेऊन आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.पी.एल.कोळी यानी अद्याप पूर्तता केलेली नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अहवाल सादर न करण्याबद्दल अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.पी.एल.कोळी यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई का करू नये, याचा खुलासा दि.२५.८.२०११ पर्यंत त्यानी सादर करावा. अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा शास्तीविषयक म्हणण्यासह खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत सेंजवाड, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर श्री.मदन कांबळे यानी दि.२५.८.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. तसा खुलासा त्यानी न दिल्यास त्याना काहीही म्हणावयाचे नाही, असे समजून पुढील कार्यवाही केली जाईल.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुहास धोंडो कुलकर्णी
प्लॉट नं.६, सहयोगनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मु.पो.ता.पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३४४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुहास धोंडो कुलकर्णी
प्लॉट नं.६, सहयोगनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मु.पो.ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.शैलेश शरद सूर्यवंशी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर तत्कालीन-श्री.सचिन डोंगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सहयोग गृहनिर्माण संस्था मर्यादित या सहकारी गृहनिर्माण संस्थेत सार्वजनिक उपक्रमासाठी ठेवलेल्या भूखंड क्र.१९ ची बेकायदेशीर विक्री विसर्जक-सहाय्यक निबंधक, पंढरपूर यानी केली असून त्यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी व खरेदीदार यानी संगनमताने या जागेची बेकायदेशीर खरेदी-विक्री केली आहे. विविध पातळ्यांवर त्याविरूध्द तक्रार केली आहे. परंतु तत्कालीन गाव कामगार तलाठी श्री.डी.टी.कवडे व हे अधिकारी मिळून कोणतीही खरी माहिती देत नाहीत. संस्थेतील सर्व भूखंडांच्या नोंदी, त्यावरील बँकबोजा यासह सर्व माहिती दि.१.४.२०१०, दि.७.४.२०१० व दि.१५.५.२०१०च्या अर्जांन्वये मागितली होती. दहा दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी देऊनही तलाठ्यांनी माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यानी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. त्यांचा अर्ज दुय्यम निबंधक पंढरपूर यांच्याकडे वर्ग केला. त्यानी दि.२७.४.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्याना शुल्क कळविले. अर्जातील इतर माहितीबाबत गाव कामगार तलाठी; पंढरपूर, महसूल अधिकारी, पंढरपूर, दुय्यम निबंधक, पंढरपूर व सहयोग गृहनिर्माण संस्था, पंढरपूर यांच्याकडे पाठवून माहिती देण्याबाबत दि.३.४.२०१० रोजी कळविले. गाव कामगार तलाठी यानी दि.३०.४.२०१० च्या पत्रान्वये माहिती दिली. उपलब्ध माहिती देण्यात आली असून अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या प्रती प्राप्त करून घेण्याबाबतही अपीलकर्त्यांना त्या त्या वेळी कळविले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी माहितीची मागणी व प्रशासकीय कार्यवाही या अनुषंगाने तक्रार व अनुषंगिक पत्रव्यवहार याची सरमिसळ केली आहे, असे दिसते. अनेक अर्जांवर एकत्रित अपील करण्याची त्यांची कृती योग्य नाही. संबंधित भूखंडाबाबत बेकायदेशीर व्यवहार झाल्याबाबतची त्यांची तक्रार व त्या अनुषंगाने त्यानी नोंदविलेले आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही.

तथापि माहितीच्या दृष्टीने संपूर्ण अभिलेख त्याना अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावेत व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या १०० पृष्ठांपर्यंतच्या प्रती निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.११.४.२०११ रोजी त्यानी समक्ष उपस्थित राहून उपरोक्त गृहनिर्माण संस्थेतील सर्व भूखंडधारकांच्या सन २००१ ते २०१० पर्यंतच्या व भूखंड क्र.१९बाबत सन १९९८ ते २०१० पर्यंतच्या ७/१२ उताऱ्यांची मागणी केली. गाव कामगार तलाठी, पंढरपूर यानी दि.१४.४.२०११ रोजी त्यानुसार सर्व उतारे दिले. तरीही आपले समाधान झाले नसल्याचे त्यानी लेखी कळविले आहे. अजूनही त्याना ज्या कागदपत्रांच्या प्रती हव्या असतील त्या देण्याची व्यवस्था करीत आहे, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.शैलेश शरद सूर्यवंशी यानी दि.२७.७.२०११ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. अहवाल सादर करण्यास आयोगाने स्मरण द्यावे लागावे, याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.शैलेश शरद सूर्यवंशी याना समज देण्यात येत आहे. अपीलकर्त्यानी अभिलेख अवलोकन करून कागदपत्रांची यादी लेखी सादर करून योग्य ते शुल्क भरून प्रती प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २९ जुलै २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मंदार दत्तात्रय तारू
१३२३, कसबा पेठ, पुणे ४११०११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणप्रमुख, शिक्षणमंडळ,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणप्रमुख, शिक्षणमंडळ,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मंदार दत्तात्रय तारू
१३२३, कसबा पेठ, पुणे ४११०११

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणप्रमुख, शिक्षणमंडळ,
पुणे महानगरपालिका, पुणे-श्री.रामचंद्र ना. जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणप्रमुख, शिक्षणमंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे
विद्यमान-श्री.संभाजी वि.जाधव, तत्कालीन-श्री.अनंता म्हाळू खंडागळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : पुणे महानगरपालिकेच्या शिक्षणमंडळासाठीच्या आर्थिक तरतुदी व खर्च, शिक्षणमंडळाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची हजेरी, बंद पडलेल्या शाळा इ.बाबतची सन एप्रिल २००९ ते मार्च २००९ या काळातील माहिती मागितली होती. ती अपुरी दिली. प्रथम अपिलानंतरही पूर्ण माहिती आजतागायत मिळालेली नाही.

<u>तत्कालीन जन माहिती अधिकारी</u> : अपीलकर्ता यानी दहा वर्षांच्या काळातील अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. शाळांबाबतची उपलब्ध माहिती त्याना तीन आठवड्याच्या आत पाठविली. तसेच अर्थसंकल्पीय तरतुदींबाबतची उत्तरेही दिली. ऑगस्ट २०१० मध्ये मी निवृत्त झालो, त्यापूर्वी शिक्षणमंडळाच्या अधीक्षकांकडे सर्व माहिती सादर केली.

<u>अपिलीय प्राधिकारी</u> : अपीलकर्त्यांनी दि.१३.५.२००९ च्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती ही अनेक विभागांकडील होती. ती सर्व विभागांकडून संकलित करून देणे आवश्यक होते. तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यानी दोन विभागाकडील माहिती ठेवून ऊर्वरित माहिती दिली. ऊर्वरित मुद्दयांची माहिती संकलित करून दिली गेलेली नाही. तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यानी प्रथम अपिलाची सुनावणी विहित मुदतीत घेतल्याचे दिसत नाही. त्यानंतर दोन तारखा देऊनही अपीलकर्ता सुनावणीला हजर राहिले नाहीत. तरीही सातत्याने पाठपुरावा करून माहिती संकलित करून अपीलकर्त्यास आज पुरविली.

अपिलीय प्राधिकारी यानी माहिती संकलनाबाबतचा विभागवार तपशील व केलेल्या प्रयत्नांचा कागदपत्रांच्या प्रतींसह लेखी अहवाल सादर केला. तो लक्षात घेता माहिती संकलित करून देण्यासाठी लागलेला कालावधी मान्य करण्यात येत आहे. मात्र अपीलकर्त्यास विस्तृत माहितीबाबत व संकलनासाठी लागणाऱ्या अवधीबाबत वेळीच कल्पना देणे आवश्यक आहे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणप्रमुख, शिक्षणमंडळ, पुणे महानगरपालिका, पुणे

श्री.अनंता म्हाळू खंडागळे याना देण्यात येत आहे. तसेच शिक्षणमंडळातील सर्व संबंधित विभागप्रमुखांनाही याची जाणीव असणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.धनंजय चांगदेव वळेकर
मु.पो.मोरेवस्ती, उपळाई (ठों), ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९३६ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.धनंजय चांगदेव वळेकर
मु.पो.मोरेवस्ती, उपळाई (ठों), ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.राजेंद्रकुमार केशवराव साळुंखे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : कंत्राटदाराने सर्वेक्षणाचा निकष डावलून अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर चुकीच्या ठिकाणी बसविला व विजेचे तीन पोल तारांसह काढले. याबाबत तक्रारी करूनही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून कोणतीही कारवाई संबंधितांविरूध्द केली जात नाही. विजेचे व तारा काढण्याचे अधिकार कोणाला दिले, अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर कशाच्या आधारे मंजूर केले व त्याच्या मंजुरीचा तपशील याबाबतची माहिती दिली जात नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : सर्वेक्षणानुसार नकाशा तयार करावा लागतो. संबंधित प्रकरणात मी गुन्हा दाखल केला आहे.

संबंधितांवर कारवाई करण्याची अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि अतिरिक्त ट्रान्सफॉर्मरची मंजुरी, सर्वेक्षणाचा नकाशा व विजेचे खांब व तारा काढल्या गेल्याच्या संदर्भातील कारवाईची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर श्री.एस.बी.साठे यानी दि.३०.८.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आत्माराम उमाजी गायकवाड
आण्णासाहेब मगर माध्यमिक विद्यालयासमोर, तक्षशिलानगर,
मु.पिंपळे सौदाग, पो.औंध कॅम्प, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
१७, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे-४११००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय
पुणे विभाग, पुणे, १७, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१२१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.आत्माराम उमाजी गायकवाड
आण्णासाहेब मगर माध्यमिक विद्यालयासमोर, तक्षशिलानगर,
मु.पिंपळे सौदाग, पो.औंध कॅम्प, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
१७, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे-४११००१

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे विभाग, पुणे, १७, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : माझी पदोन्नती व सेवाज्येष्ठता याबाबत शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यानी कार्यवाही केली नाही. तसेच शिक्षणाधिकारी कार्यालयाकडील माहिती दिली नाही व पुणे जिल्हा शिक्षण मंडळ या संस्थेने माझ्या मागणीबाबत कार्यवाही करण्याची असताना अर्ज त्यांच्याकडेही पाठविला नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : शिक्षणाधिकारी कार्यालयाने श्री.गायकवाड यांच्या पदोन्नतीविषयीच्या कार्यवाहीबद्दल संबंधित असलेल्या पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे या संस्थेला कळविले. सन १९९० ते २००८ या कालावधीतील पदोन्नती, नेमणूका, नियुक्त्या याबाबतची सविस्तर माहिती संस्थेने अपीलकर्त्यांना पूर्वीच दिलेली आहे व त्याची प्रत आमच्या कार्यालयाला सादर केलेली आहे. संस्थेने केलेल्या नियुक्त्या, पदोन्नती या योग्य की अयोग्य, हा माहितीच्या अधिकारातील विषय नाही. श्री.गायकवाड याना याच संदर्भात वेळोवेळी माहिती दिली असून माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करून संस्थेला ते नाहक त्रास देत आहेत, असे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या सचिवानी लेखी दिले आहे. आयोगाने याच संदर्भातील श्री.गायकवाड यांचे अपील क्र.७९९/२०१०/पुणे जुलै २०१० मध्ये फेटाळले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती

देण्यात आली आहे. कार्यवाहीची अथवा स्पष्टीकरण, खुलासा, अभिप्राय यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अधिनियमांतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.माधव गोपाळ पेंडसे
स्वागत, सेक्टर २१, प्लॉट ५१६, यमुनानगर, टेलीफोन एक्सचेंजजवळ,
यमुनानगर, निगडी, पुणे-४११०४४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभाग अधिकारी, अ प्रभाग कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, निगडी, पुणे-४११०४४ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, अ प्रभाग कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, निगडी, पुणे-४११०४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१२४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माधव गोपाळ पेंडसे
स्वागत, सेक्टर २१, प्लॉट ५१६, यमुनानगर, टेलीफोन एक्सचेंजजवळ,
यमुनानगर, निगडी, पुणे-४११०४४

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभाग अधिकारी, अ प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, निगडी, पुणे श्री.एस.जे.वाळके, तत्कालीन-श्री.पी.एच.झुरे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, अ प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, निगडी, पुणे तत्कालीन-श्री.ए.जी.भोसले |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे केलेल्या तक्रारीचे निवारण करण्याची निश्चित स्वरूपाची पध्दत महानगरपालिकेकडे आहे की नाही व असल्यास कोणती, याची विचारणा केली होती. परंतु अपुरी व दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली. पाणीपट्टी-बिल मूळ मालक म्हणून माझ्या नावे यावे, या संदर्भातील काही मुद्दे व ऊर्वरित मुद्दे महानगरपालिका आयुक्तांकडे येणाऱ्या पत्राची पोहोच, त्याचे वेगळे रजिस्टर इ. संदर्भातील होती. माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी देऊनही माहिती दिली नाही.

<u>तत्कालीन जन माहिती अधिकारी</u> : श्री.पेंडसे यांच्या अर्जात बहुसंख्य मुद्दे ते स्वतः राहत असलेल्या जागेची मालकी, मिळकत करावरील नावे, पाणीपट्टीच्या बिलावरील नावे या संदर्भातील होते. त्यांच्या मागणीनुसार बिलावर त्यांचे नाव लावण्यात आले. महानगरपालिका आयुक्तांना पाठविलेल्या अर्जांची पोहोच वगैरेबाबत प्रत्यक्ष चर्चेत खुलासा केला.

<u>तत्कालीन अपिलीय प्राधिकारी</u> : महानगरपालिकेकडे तक्रारीबाबतचा स्वतंत्र विभाग आहे. तसे जाहीरही करण्यात आले असून अपीलकर्त्यांना समक्षही सांगितले. नागरिकांच्या सनदेमध्ये त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख आहे.

अपीलकर्त्यांनी प्रशासकीय कार्यवाहीची मागणी व माहिती याची सरमिसळ केली आहे. सूचनेच्या अनुषंगाने अपेक्षित कार्यवाही असे त्यांच्या निवेदनाचे स्वरूप आहे. तथापि नागरिकांच्या

तक्रारींबाबत दखल घेण्याच्या महानगरपालिकेत असणाऱ्या व्यवस्थेची माहिती व नागरिकांच्या सनदेची प्रत अपीलकर्त्याना पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा प्रभाग अधिकारी, अ प्रभाग कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, निगडी, पुणे श्री.एस.जे.वाळके यानी दि.३०.६.२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हौशीराम भाऊ सांगडे
बाळू कोंडिबा मालपुटे चाळ, शिंगोटे चाळीजवळ,
महादेव आळी, दापोडी, पुणे-४११०१२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी(गोदाम),
शिवाजीनगर, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी फ विभाग,
शिवाजीनगर, धान्य गोदाम, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हौशीराम भाऊ सांगडे
बाळू कोंडिबा मालपुटे चाळ, शिंगोटे चाळीजवळ, महादेव आळी, दापोडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी(गोदाम),
शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्रीमती ए.पी.ढवळे

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी फ विभाग, शिवाजीनगर, धान्य गोदाम, पुणे प्रतिनिधी श्रीमती के.अे.थोरात | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : स्वस्त धान्य दुकानाचा परवाना श्री.व्ही.जी.पवार यांच्या नावावर असून गेल्या आठ-नऊ वर्षापासून दुकान बंद असूनही त्यांच्या नावाने धान्याचा कोटा वितरित केला जातो. हे बेकायदेशीर असून पावत्याही चुकीच्या आहेत. त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यानी दिशाभूल करणारी व चुकीची दिली.

<u>जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी</u> : संबंधित दुकान श्री.पवार यांच्या नावावर असले तरी ते माल उचलत नसल्याने त्यांचा परवाना श्री.आर.पी.कर्नावट यांच्या स्वस्त धान्य दुकानाच्या परवान्याला जोडण्यात आला आहे. ग्राहकांची गैरसोय होऊ नये म्हणून अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्या आदेशानुसार ही व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्याबाबतची माहिती नाकारलेली नाही. सर्व कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून घेण्याबाबत अपीलकर्त्यास वेगवेगळया अर्जांवर त्या त्या वेळी कळविले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या अनुपस्थितीबाबतचे लेखी निवेदन सादर करण्यात आले. तसेच देऊ केलेल्या माहितीच्या प्रतीही जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी फ विभाग, शिवाजीनगर, धान्य गोदाम, पुणे यांच्या प्रतिनिधी श्रीमती के.अे.थोरात यानी सादर केल्या.

अपीलकर्त्यास मूळ कागदपत्रानुसार माहिती देण्यात आल्याचे दिसून येते. प्रशासकीय कार्यवाही कायदेशीर की बेकायदेशीर, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सल्टीज, हिरामण लांडे बिल्डिंग,
मुंबई-पुणे, रोड, कासारवाडी, पुणे-३४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माणगाव, तहसील कार्यालय, माणगाव,
ता.माणगाव, जि. रायगड उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माणगाव,
तहसील कार्यालय, माणगाव, ता.माणगाव, जि. रायगड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२४३ अ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, माणगाव, तहसील कार्यालय, माणगाव, ता.माणगाव, जि. रायगड श्री.सुरेश कदम

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, माणगाव, तहसील कार्यालय, माणगाव, ता.माणगाव, जि. रायगड श्री.शिवाजी गोविंद जाधव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर यानी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. पुरवठा शाखेशी ती संबंधित असल्यामुळे त्या शाखेकडून घेऊन श्री.बावधनकर याना तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी पाठविली होती. ती अपुरी असल्याच्या कारणावरून त्यानी अपील केले होते. त्यानंतर माहितीचे विस्तृत प्रमाण लक्षात घेऊन आयोगाकडून मुदत मागून संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास पाठविली. परंतु पत्ता चुकीचा असल्यामुळे ती परत आली. ती पुन्हा पाठवीत आहोत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मागणगाव, तहसील कार्यालय, माणगाव, ता.माणगाव, जि. रायगड श्री.शिवाजी गोविंद जाधव यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यानी अत्यंत विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असून तशा प्रकारे संकलित करून देण्यासाठी लागलेला विलंब मान्य करण्यात येत आहे. मात्र विहित मुदतीत अपीलकर्त्यास तसे कळविणे आवश्यक असून पत्त्यासारख्या तपशिलाबाबत निष्काळजीपणा योग्य नाही, याबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मागणगाव, तहसील कार्यालय, माणगाव, ता.माणगाव, जि. रायगड श्री.व्ही.एल.गायकवाड व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मागणगाव, तहसील कार्यालय, माणगाव, ता.माणगाव, जि. रायगड श्री.सुरेश कदम यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत सखाराम घाडी
रक्षकनगर, फेज-२, बिल्डिंग नं.२०२, खराडी बायपास, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय-२),
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय),
पुणे शहर, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६०० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय-२), पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री.राजेश बनसोडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय), पुणे शहर, शिवाजीनगर, पुणे श्री.प्रकाश दगडू घार्गे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पोलीस वसाहतीमधील पोलीस कर्मचारी व कुटुंबीय यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सार्वजनिक स्वच्छतागृहाच्या संदर्भात केलेल्या तक्रारी अर्जांवरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.शशिकांत सखाराम घाडी यानी मागितली होती. मुख्यतः पुढील काळात काय कार्यवाही करणार, याची विचारणा त्यानी केली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी त्यावेळी आजारी असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय), पुणे शहर, शिवाजीनगर, पुणे श्री.प्रकाश दगडू घार्गे व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय-२), पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री.राजेश बनसोडे यानी केले. मात्र अद्यापपर्यंत कोणतीही माहिती मिळाली नाही, तसेच संबंधित वसाहतीत स्वच्छता होत नसल्याने मी शासकीय निवास सोडून माझ्या मालकीच्या घरात रहावयास गेलो आहे, असे अपीलकर्ता यानी दि.१८.४.२०११ च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

पोलीस वसाहतीत स्वच्छता होत नसल्याबाबतची अपीलकर्त्याची तक्रार व त्यावरील कार्यवाही हा प्रशासकीय भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देणे बंधनकारक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय), पुणे शहर, शिवाजीनगर, पुणे श्री.प्रकाश दगडू घार्गे व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय-२), पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री.राजेश बनसोडे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वजित विश्वनाथ नगरकर
जे-५, स्टेट बँकनगर को.हौसिंग सोसायटी, बिबवेवाडी, पुणे-४११०३७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१),
स.नं.५८२/डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-४११०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विश्वजित विश्वनाथ नगरकर
जे-५, स्टेट बँकनगर को.हौसिंग सोसायटी, बिबवेवाडी, पुणे-४११०३७

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-४११००५

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), स.नं.५८२/डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : स्टेट बँकनगर को.हौसिंग सोसायटी, बिबवेवाडी, पुणे या संस्थेची मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यानी दिली नाही. संस्थेवर कारवाई करण्याची मागणी सन २००९ मध्ये केली असूनही अद्याप कारवाई केलेली नाही.

जन माहिती अधिकारी : पुण्यामध्ये सात ठिकाणी स्टेट बँकनगर सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. अपीलकर्त्याच्या मागणीनुसार विहित मुदतीत मुद्देनिहाय उत्तर दिले. संस्थेचे वार्षिक लेखे अपीलकर्त्यासह सर्व सभासदाना देण्याबाबत संस्थेला कळविले. त्याना माहिती देण्यात आली आहे. न झालेल्या लेखा परीक्षणाचे अहवाल देता येणार नाहीत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. संस्थेवर कारवाई करणे, संस्थेने निवडणूक घेतली नसल्यासारख्या तक्रारींची दखल घेणे इ. बाबी, तसेच स्पष्टीकरण, खुलासा या स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी विनायक मोटे
रा. दापोडी, ता. दौंड , जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
दौंड तहसील कार्यालय, ता. दौंड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दौंड तहसील कार्यालय, ता. दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शिवाजी विनायक मोटे
रा. दापोडी, ता. दौंड , जि. पुणे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
दौंड तहसील कार्यालय, ता. दौंड, जि. पुणे श्री. मधुकर रंगनाथ शिंदे

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. नरेंद्र शंकर हणमहार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - जमिनीच्या नोंदीचा खोटा फेरफार करुन वारसांची फसवणूक केली. बेकायदेशीरपणे वहिवाट सदरी बोअरवेलची नोंद डॉ. मणीभाई बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., ऊरळीकांचन, ता. हवेली, जि. पुणे या पतसंस्थेच्या नावावर केली. तीन अपिले करुनही याबाबतची योग्य कार्यवाही केली जात नाही व माहितीही दिली जात नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी - अपीलकर्ते याच मुद्दयांबाबत विविध स्वरुपाचे अर्ज विविध पातळ्यांवर करीत असतात. त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून अर्ज निकाली काढल्याचे कळविले.

विद्यमान जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून महसूल न्यायालयाकडे, तसेच तहसीलदार कार्यालयाकडे अपील करणे, तसेच बोअरवेलच्या नोंदीसंदर्भात जमिनीची मोजणी करुन घेणे आवश्यक आहे, असे वारंवार स्पष्ट केले आहे. बोअरवेलविषयीची त्यांची तक्रार मंडल अधिकारी व गाव कामगार तलाठी यांना कळविली असून तलाठयांचा अहवाल अप्राप्त आहे.

अपीलकर्त्यांच्या मागणीबाबत तलाठयांकडून मागविलेला अहवाल ८ दिवसांत आयोगास सादर करुन त्याची प्रत अपीलकर्त्यांना पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्याची पूर्तता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अद्याप केलेली नाही. ही बाब गंभीर आहे. मात्र अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१ .अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार विहित मुदतीत पूर्तता न केल्याबाबतच्या खुलाशासह अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २५/८/२०११ पर्यंत

आयोगास सादर करावा. त्यानुसार कार्यवाही न झाल्यास ते कार्यवाहीस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सचिन बन्सीलाल तरंगे
मु. पो. रेडणी, ता. इंदापूर, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
कै. समाजरत्न शिवाजीराव शेंडगे (बापू) माध्यमिक विद्यालय,
तरंगवाडी, ता. इंदापूर जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९७३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सचिन बन्सीलाल तरंगे
मु. पो. रेडणी, ता. इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन, पुणे श्रीमती विद्या शिंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राजामाता प्रतिष्ठान संचलित कै. समाजरत्न शिवाजी शेंडगे (बापू) माध्यमिक प्रशालेमध्ये मागितलेली कोणतीही माहिती मिळत नसल्याची तक्रारी अपीलकर्ता श्री. सचिन बन्सीलाल तरंगे यानी केली.

राजामाता प्रतिष्ठान संचलित कै. समाजरत्न शिवाजी शेंडगे (बापू) माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांबाबत जून २००४ ते जून २०१० या काळातील विस्तृत स्वरुपाची माहिती अपीलकर्ता श्री. सचिन बन्सीलाल तरंगे यानी मागितली होती. वेळोवेळी त्याना माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. तथापि प्रस्तुत अपिलातील माहिती दि. २०/११/२०१० पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दरम्यान मान्य केले होते. त्यानुसार कार्यवाही झाली की नाही, याबाबत उभय बाजूंनी आम्हाला कळविलेले नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन, पुणे श्रीमती विद्या शिंदे यानी केले.

अपीलकर्त्यांनी अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून माहितीबाबत अपिलीय प्राधिकारी यानी जन माहिती अधिकाऱ्यांनी ान माहिती अधिकाऱ्यांना कळविलेले आहे. वस्तुतः एवढया विस्तृत स्वरुपाची माहिती हवी असल्यास अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकन करु देणे व त्यातील  कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांच्या मागणीनुसार पुरविणे, अशी कार्यपध्दती अवलंबिली पाहिजे. तथापि माहिती देण्याबाबत त्यानी केलेल्या कार्यवाहीचा खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन, पुणे श्रीमती विद्या शिंदे यानी ८ दिवसांत त्यांच्याकडून प्राप्त करुन आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. असा अहवाल आयोगास अद्याप प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाही खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन, पुणे श्रीमती विद्या

शिंदे यानी दि. २५/८/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा. तसे न केल्यास त्या व माहिती

दिली नसल्यास जन माहिती अधिकारी श्री. आर. एस. मगर कारवाईस पात्र ठरतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मधुकर माझिरे
निर्माण भारती, ११ तेजश्री, ९४/७,
भुसारी कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे ४११ ०३८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (जनरल),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सेवकवर्ग विभाग अधिकारी,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४५२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मधुकर माझिरे
निर्माण भारती, ११ तेजश्री, ९४/७,
भुसारी कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (जनरल),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यांचे वतीने श्री. शिवाजी भिवाजी दौंडकर

**जन माहिती अधिकारी** तथा सेवकवर्ग विभाग अधिकारी,

| | |
|---|---|
| | पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. खेवजी तु. भोईर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - गेल्या ३ वर्षांमध्ये पुणे महानगरपालिकेने दिलेल्या देणग्या व सहप्रायोजकत्व याबाबतची माहिती मगितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी ती दिली नाही. १५ दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिले असूनही त्या मुदतीत माहिती न देता दि. ८/३/२०११ रोजी माहिती दिली. परंतु ती समाधानकारक नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांचा अर्ज दि. २७/४/२०१० रोजी प्राप्त झाला. माहिती देणगी विभागासंदर्भातील असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. के. टी.भोईर यानी तो दि. ३/५/२०१० रोजी त्या विभागाकडे वर्ग करुन अपीलकर्त्यास तसे कळविले. देणगी विभागातील वरिष्ठ श्रेणी लेखनिक श्री. सुनिल चांदेरे याना माहितीबाबत वारंवार स्मरणही दिले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही समज देऊनही श्री. चांदेरे यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही. देणगी विभागाकडे ते एकमेव कर्मचारी असून १ वर्ष जनगणनेच्या कामात होते. त्यामुळे ते माहिती देऊ शकले नाहीत. माहिती अपूर्ण असल्याचे अपीलकर्ता म्हणत असले तरी अपूर्णता त्यानी स्पष्ट केल्यास अभिलेख दाखवून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देता येतील.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. के. टी.भोईर व माहिती देण्याची जबाबदारी सोपविल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा कलम ५ (४,५) अन्वये जन माहिती अधिकारी ठरणारे वरिष्ठ श्रेणी लेखनिक श्री. सुनिल चांदेरे यानी विलंबाबाबतचा खुलासा शास्तीविषयक म्हणण्यासह आयोगास सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. के. टी.भोईर व श्री. सुनिल चांदेरे यांचा खुलासा प्राप्त करुन घेऊन अपिलीय प्राधिकारी यानी दि. १९/४/२०११ च्या पत्रान्वये आयोगास अहवाल सादर केला. तो पाहता श्री. भोईर यानी माहिती पुरविण्यासाठी अर्ज वर्ग करुन श्री. चांदेरे याना स्मरण दिले. मात्र देणगी

विभागाकडे श्री. चांदेरे हे एकच कर्मचारी असून दि. २६/४/२०१० पासून दि. ५/३/२०११ पर्यंत त्याना जनगणनेच्या कामाकडे वर्ग करण्यात आले होते. हजर झाल्यानंतर त्याच दिवशी त्यानी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविली व दि. ७/३/२०११ रोजी ती अपीलकर्त्यास देण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (जनरल),पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. के. सी. कारकर यानी अहवालात पूरक कागदपत्रांसह नमूद केले आहे. हा अहवाल मान्य करण्यात येत आहे. मात्र ही परिस्थिती अपवादात्मक असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले जाणे व अशा प्रकारची अपवादात्मक अडचण असल्यास तसे कळविणे अथवा माहितीची पर्यायी व्यवस्था करणे अशी उपाययोजना केली पाहिजे, याची समज अपिलीय प्राधिकारी श्री. शिवाजी भिवाजी दौंडकर याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बी. एन. शिंदे
गणेशखिंड, पी. बी. नं. १३, पुणे ४११ ००७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
दक्षता सुरक्षा व अंमलबजावणी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संचालनालय, हाँगकाँग बँक इमारत, ३ रा मजला,
एम.जी.रोड, मुंबई मलठण — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक,
दक्षता सुरक्षा व अंमलबजावणी,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पुणे परिक्षेत्र, रास्ता पेठ, पुणे - ११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. बी. एन. शिंदे
गणेशखिंड, पी. बी. नं. १३, पुणे ४११ ००७

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
दक्षता सुरक्षा व अंमलबजावणी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

| | |
|---|---|
| | संचालनालय, हाँगकाँग बँक इमारत, ३ रा मजला, एम.जी.रोड,<br>मुंबई मलठण यांचे प्रतिनिधी श्री. रविंद्रनाथ जयराम पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक,<br>दक्षता सुरक्षा व अंमलबजावणी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>पुणे परिक्षेत्र, रास्ता पेठ, पुणे श्री. शिवाजी शंकरराम इंदलकर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - २१ कोटी रुपयांची वीज चोरी उघडकीला आणण्याचा दावा उप संचालक, दक्षता सुरक्षा व अंमलबजावणी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे परिक्षेत्र, रास्ता पेठ, पुणे यानी केला असून त्याबाबत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने पुराव्याबाबतची माहिती मागितली होती. प्रत्यक्ष या कार्यालयाने/उप संचालकांनी वीज चोरी उघड केलेली नाही. वीज बिलाच्या वसूलीसंबंधी कोणतीही कारवाई केलेली नाही. मात्र सवंग प्रसिध्दीसाठी व आपल्या खोटया कार्यक्षमतेची वर्तमान पत्रामध्ये बातमी देऊन आपल्या वरिष्ठांकडून गौरव करुन घेऊन शाबासकीने पाठ थोपटून घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे. हा खोटेपणा उघड होणे आवश्यक आहे. वीज चोरी पकडल्याच्या पंचनाम्याची प्रत व कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन मिळत नाही. अर्ज केल्यापासून ३१ व्या दिवशी उत्तर दिले असून तेही नंतरची तारीख टाकून दिलेले आहे. मी टपालाने माहिती मागितली असता मोबाइलवर एस.एम.एस. केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. एस.एम.एस.द्वारे माहिती मागितली नव्हती.

जन माहिती अधिकारी - वर्तमानपत्रांतील बातम्यांच्या आधाराने माहिती मागितली असून अन्य कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन माहिती पाठविली. तरीही एक दिवसांचा विलंब झाला असल्यामुळे शुल्क आकारले नाही. त्यानी उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांबाबत तपशीलवार माहिती दिली. पत्र हस्तपोच करुन कळविले. तसेच सोयीचा भाग म्हणून एस.एम.एस. ही पाठविला. एस.एम.एस विषयी संबंधित कंपनीकडून पत्रही प्राप्त केलेले आहे. वीजचोरीबाबत पंचनामा झाला नसल्यामुळे त्याची प्रत देता आली नाही. मात्र अन्य कागदपत्रांच्या प्रती दिल्या.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. वर्तमानपत्रातील बातमीबाबतचे पुरावे व स्पष्टीकरणात्मक विचारणा ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये 'माहिती' ठरत नाही. अपीलकर्त्यांचे अन्य भाष्य व आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दखल घेण्याचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण शेषाद्री कुलकर्णी
विश्वकमल, फलॅट नं. ३, पहिला मजला,
आबासाहेब रायकर नगरच्या समोरील गारमाळ,
धायरी, पुणे ४११ ०४१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),
उस्मानाबाद यांचे कार्यालय, उस्मानाबाद
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
तुळजापूर तहसील कार्यालय, मु. पो. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१२/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,<br>तुळजापूर तहसील कार्यालय, मु. पो. तुळजापूर,<br>जि. उस्मानाबाद यांचे वतीने श्री. अतुल केरबा वाघमारे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

भूकंपग्रस्तांना वितरित केलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने व अनुदानासाठी स्वतः केलेल्या अर्जाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. नारायण शेषाद्री कुलकर्णी यानी दोन अर्जांद्वारे मागितली होती. तसेच दि. ३१/५/२००८ (प्राप्त दि. २/६/२००८) च्या अर्जानुसार दि. ३०/८/२००८ रोजी माहिती दिली. प्रथम अपिलातील चर्चेनंतर आणखी कागदपत्रासह माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिल्यानंतर पूर्तता करण्यात आली. तसेच दि. २/८/२००८ च्या अर्जानुसार दि. ६/९/२००८ रोजी माहिती देण्यात आली. माहिती मिळाल्याचे त्यानी लेखी देऊनही नंतर अपील केले. त्यावेळी पहिल्या अपिलाच्या सुनावणीतील निर्णयानुसार त्याना पुन्हा माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री. अतुल केरबा वाघमारे यानी केले. जन माहिती अधिकाऱ्यांचे या आशयाचे लेखी निवेदन त्यानी सादर केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बापू गोरख शिंदे
७८ बी, गोलघर जनवाडी, शिवाजीनगर, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण घोले रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, मनपा मुद्रणालय आवार,
घोलेरोड, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण घोले रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, मनपा मुद्रणालय आवार,
घोलेरोड, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६५४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण घोले रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, मनपा मुद्रणालय आवार,
घोलेरोड, पुणे श्री. चंद्रकांत गणेश गायकवाड

| | |
|---|---|
| | **तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्रीमती मीरा श्रीनिवास सबनीस |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बापू गोरख शिंदे यानी मे १९९९ मधील कार्यवाहीच्या संदर्भात कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. त्या उपलब्ध होत नसल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी त्याना विहित मुदतीत कळविले होते. प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या अन्य कागदापत्रांच्या प्रती पुरविल्या व माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्यांनी कबूल केले, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती मीरा श्रीनिवास सबनीस यानी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुभाष बन्सी खाडे
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, रानीचा बाग, पुणे- ४११ ००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर अधिकारी,
आदिवासी विकास, ठाणे, वरदान संकुल,
९ वा मजला, एम.आय.डी.सी.कार्यालयासमोर,
वागळे इस्टेट, रोड नं. १६, ठाणे (प)- ४०० ६०४

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
आदिवासी विकास, ठाणे, वरदान संकुल,
९ वा मजला, एम.आय.डी.सी.कार्यालयासमोर,
वागळे इस्टेट, रोड नं. १६, ठाणे (प)- ४०० ६०४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुभाष बन्सी खाडे
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, २८, रानीचा बाग, पुणे- १

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त,
आदिवासी विकास, ठाणे, वरदान संकुल,
९ वा मजला, एम.आय.डी.सी.कार्यालयासमोर,
वागळे इस्टेट, रोड नं. १६, ठाणे (प) श्री. मुस्ताक अब्दुलगनी शेख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - श्री. जे. व्ही.अवचट, उपलेखापाल, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई हे २४ वर्षे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयात पुण्यातच कामाला होते. त्याना दोन आगाऊ वेतनवाढी देऊन तात्पुरत्या बदलीने दोन दिवस पदोन्नती दिली व बदलीच्या जागी ते हजर झाल्यानंतर नियमबाहयरीत्या पुन्हा पुणे येथील कार्यालयात पर्यायी व्यवस्था म्हणून पदस्थापना केली. या सर्व गैरप्रकाराच्या अनुषंगाने स्पष्ट माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांच्या दि. १०/६/२०१० च्या अर्जाला दि. ३०/६/२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. उत्तर मोघम असल्याच्या कारणावरुन त्यानी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. श्री. अवचट यांच्या बाबत पर्यायी व्यवस्था ही कायम स्वरुपाची नसून तात्पुरत्या स्वरुपाची आहे, असे अपिलीय प्राधिकारी यानी त्यावेळी स्पष्ट केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांना माहिती देण्यात आली असून श्री. अवचट यांच्या पदस्थापनेबाबतची त्यांची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र श्री. अवचट याना देण्यात येणारे वेतन/भत्ते या बाबतचा तपशील ३ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी यानी दि. ११/४/२०११ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास त्याची प्रत पुरविणे अपेक्षित आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर नानासाहेब चव्हाण
सहसंपादक, सा.विजयवाणी, संभाजीनगर, जत, सांगली,
पो.बॉक्स-२३, ता.जत, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,
वारणाली, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग, वारणाली, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६४ / २००९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग,
वारणाली, जि.सांगली श्री.म.सु.लोंढे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

लघुपाटबंधारे स्थानिक स्तर, जत उपविभागाच्या कक्षेत १ मार्च १९९८ ते २१ ऑगस्ट २००७ अखेर झालेल्या व मंजूर असलेल्या सर्व कामांची सर्व माहिती अपीलकर्ता श्री.प्रभाकर नानासाहेब चव्हाण यानी मागितली होती. त्याना पत्र पाठवूनही प्रतिसाद मिळत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, वारणाली, जि.सांगली श्री.म.सु.लोंढे यानी केले.

अपीलकर्त्यानी १० वर्षाच्या काळातील विस्तृत स्वरूपाची माहिती सरसकट स्वरूपात मागितली असून कामाचा उद्देश साध्य झाला आहे का, अशा स्वरूपाची विचारणाही केली आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- ३० जुलै २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
<u>**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**</u>

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.किशोर डी.काळे
४०६, अमित कोर्ट, शिवाजीनगर, पुणे-४११००५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**(१)अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, दौंड, ता.दौंड, जि.पुणे
**(२)अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, दौंड,
ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९९२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**(१)अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, दौंड, ता.दौंड, जि.पुणे
प्रतिनिधी श्री.एम.आर.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, दौंड,
ता.दौंड, जि.पुणे श्री.प्रदीप रामचंद्र ताारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

कोर्ट वाटप प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती व त्या अनुषंगाने स्पष्टीकरणात्मक विचारणा करणारा अर्ज अपीलकर्ता ॲड.किशोर डी.काळे यानी अन्य व्यक्तीच्या प्रकरणासंदर्भात दि.१८.९.२०१० रोजी केला होता. दि.१४.१०.२०१० च्या पत्रान्वये त्याना माहिती देण्यात आली. कार्यवाहीचा संपूर्ण तपशील देण्यात आला असून मूळ प्रकरणात शकांची पूर्तता केल्याबाबतचे पत्र उपअधीक्षक, भूमी अभिलेख, दौंड यांच्याकडे दि.१८.६.२०११ रोजी प्राप्त झाले आहे. त्यानुसार सदर प्रकरणी लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, दौंड, ता.दौंड, जि.पुणे यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री.एम.आर.शिंदे, निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, दौंड, ता.दौंड, जि.पुणे यानी सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बापू पांडुरंग पोळ
मु. गोखळी, पो. बिजवडी, ता. इंदापूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक कक्ष, यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा लेखाधिकारी,
जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक कक्ष, यशवंतराव चव्हाण भवन, जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०७/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बापू पांडुरंग पोळ
मु. गोखळी, पो. बिजवडी, ता. इंदापूर, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा लेखाधिकारी,
जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक कक्ष, यशवंतराव चव्हाण भवन,
जिल्हा परिषद, पुणे श्रीमती अंजली किशोर धुळेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> –'आपल पाणी' या योजनेतून ग्रामपंचायत झगडेवाडी, ता. इंदापूर येथे झालेल्या कामाबाबतची माहिती दि. ३/३/२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२१/३/२००९ रोजी शुल्क कळवून अर्ज ग्रामआरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, झगडेवाडी, ता. इंदापूर यांच्याकडे वर्ग केला. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी प्रथम अपिलाची दखल घेतली नाही. आयोगाकडे अपील केल्यानंतर खोटी व दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी यानी दिली. मूळ कागदपत्रे वेगळी आहेत व मला दिलेली माहिती वेगळी आहे.

<u>जन माहिती अधिकारी</u>- अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती आमच्या कक्षेतील नाही. ग्रामसभेच्या मंजुरीने गठित केलेल्या ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, झगडेवाडी, ता. इंदापूर यांच्या कक्षेतील ती माहिती असल्याने अर्ज समितीकडे वर्ग करुन अपीलकर्त्यास तसे कळविले. समितीच्या सचिवांनी त्याना पाठविलेले पत्र सदर 'इसमाला इंटीमेशन देवून मुदतीत भेटत नाही सबब पाठविणाऱ्यास परत' अशा आशयाचा शेरा मारुन परत आले. त्यानंतर ते कार्यालयात आले असता शुल्क सांगून विनंतीनुसार चलनही भरुन दिले. परंतु शुल्क भरल्याचे चलन त्यानी आणून दिले नाही. पुन्हा माहिती दिली नाही. राज्य माहिती आयोगाकडे अपील केले असून माहिती नि:शुल्क द्यावी, अशी त्यानी मागणी केली. समितीने कार्यालयाला पुरविलेली माहिती त्याना दिली.

माहितीबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. पत्र न स्वीकारता व शुल्क न भरता माहिती प्राप्त करुन घेण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. आवश्यक असल्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन करुन आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेण्याचा मार्ग त्याना उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात  येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. म. सलीम महिबूब सय्यद
एल-२०, मोदी हुडको, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक,
सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९६/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. म. सलीम महिबूब सय्यद
एल-२०, मोदी हुडको, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. बी.एस.कटकदौड

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक,
सहकारी संस्था, शहर सोलापूर, सोलापूर श्री. संजय एस. राऊत

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- सोलापूर महानगरपालिका वरिष्ठ श्रेणी सेवक सहकारी पतसंस्थेच्या गैरकारभारा- बाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने व संचालकांना अपात्र ठरविण्याच्या मागणीबाबत चौकशी व कारवाई केली असल्यास अहवालाची माहिती मागितली. विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, पुणे यानी हा अर्ज जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्याकडे वर्ग केला. त्यानी तो उप निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्याकडे पाठविला. ४ महिने होऊनही अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही.

जन माहिती अधिकारी -अपीलकर्ता यानी विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्याकडे अर्ज केला होता. त्यांची मूळ तक्रार त्याच कार्यालयाने सप्टेंबर २००९ मध्ये निकाली काढली होती व त्याबाबत तक्रार असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०चे कलम १५२ अन्वये अपील दाखल करुन निर्णय मागू शकता, असे कळविलेले होते. याच कार्यवाहीची माहिती विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, पुणे कार्यालयही देऊ शकले असते. मात्र चौकशी करुन अहवाल देण्याची त्यांची मागणी अथवा संचालकांवरील कारवाईची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, पुणे या कार्यालयाने मूळ तक्रारीवर कार्यवाही केली असल्यामुळे त्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्ज अन्य कार्यालयांकडे वर्ग न करता उत्तर द्यावयास हवे होते, याची समज विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, पुणे कार्यालयातील जन माहिती अधिकारी श्री. संजय एस. राऊत याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे
मु. पो. केंदूर, ता. शिरुर, जि. पुणे ४१२ ४०३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
हिवताप हत्तीरोग व जल जन्य आजार,
पुणे यांचे कार्यालय, आळंदी रोड, येरवडा, पुणे ४११ ००६
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह संचालक,
हिवताप हत्तीरोग व जल जन्य आजार,
पुणे यांचे कार्यालय, आळंदी रोड, येरवडा, पुणे ४११ ००६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३००/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/४/२०११ |

**३. उपस्थित**

श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे
मु. पो. केंदूर, ता. शिरुर, जि. पुणे ४१२ ४०३

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
हिवताप हत्तीरोग व जल जन्य आजार,
पुणे यांचे कार्यालय, आळंदी रोड, येरवडा, पुणे श्री. डॉ. सुधाकर कोकणे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा सह संचालक,
हिवताप हत्तीरोग व जल जन्य आजार,
पुणे यांचे कार्यालय, आळंदी रोड, येरवडा, पुणे श्रीमती भावना सुरेश चौधरी

| | |
|---|---|
| | **तत्कालीन जन माहिती अधिकारी** डॉ. रजनी रामदास खुणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता उपस्थिती पटावर स्वाक्षरी करुन निघून गेले. आयोगाकडील सुनावणीस थांबले नाहीत.

आरोग्य खात्यातील भ्रष्टाचारासंदर्भात दाखल तक्रारी अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री. भाऊसाहेब धोंडीबा गावडे यानी मागितली होती. त्याच्या मूळ तक्रारीनुसार चौकशी करण्यात आली होती व त्याबाबतचा अहवाल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सादर केला. तोच तपशील त्याच वेळी अपीलकर्त्यांना कळविण्यात आला आहे. तीच माहिती त्यानी विचारल्यावरुन पुरविण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सह संचालक, हिवताप हत्तीरोग व जल जन्य आजार, पुणे यांचे कार्यालय, आळंदी रोड, येरवडा, पुणे श्रीमती भावना सुरेश चौधरी व अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, हिवताप हत्तीरोग व जल जन्य आजार, पुणे यांचे कार्यालय, आळंदी रोड, येरवडा, पुणे डॉ. सुधाकर कोकणे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. सुनिता कैलास पाटील
योजना भवन, गोल्डन पार्क, कलानगर,
माधवनगर रोड, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
प्राथमिक शिक्षण मंडळ, जि. सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक तथा लेखापाल,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
प्राथमिक शिक्षण मंडळ, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३२/२००९/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** सौ. सुनिता कैलास पाटील
योजना भवन, गोल्डन पार्क, कलानगर, माधवनगर रोड, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,

| | |
|---|---|
| | सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका,<br>प्राथमिक शिक्षण मंडळ, जि. सांगली श्री. अनिल अ. पाटील<br><br>**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक तथा लेखापाल,<br>सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका,<br>प्राथमिक शिक्षण मंडळ, जि. सांगली श्री. राजाराम लिंगाप्पा माळी<br><br>**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. बी.जी.वाघमोडे<br><br>**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. यशवंत आत्माराम सोकटे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्त्या - प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाकडील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या संदर्भात माहिती मागणाऱ्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी उत्तर दिले नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी आदेशात जन माहिती अधिकाऱ्यांना दंड करण्याची शिफारस केली असून त्याप्रमाणे कारवाई व्हावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बी.जी.वाघमोडे - अपीलकर्त्यांचा दि. २८/५/२००९ चा अर्ज प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, नगरपालिका यानी दि. ७/६/२००९ रोजी माझ्याकडे दिला. दि. १५/६/२००९ रोजी मला निलंबित करण्यात आले. अत्यंत मर्यादित काळ जन माहिती अधिकाऱ्याच्या पदाचा कारभार माझ्याकडे असल्यामुळे त्या बाबत मी जबाबदार नाही व माझ्यावर कारवाई होऊ नये.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. यशवंत आत्माराम सोकटे - माझ्या आधीचे जन माहिती अधिकारी श्री. वाघमोडे यांच्याकडील अपीलकर्त्यांचा अर्ज मला प्राप्त झाला नव्हता. अर्ज प्राप्त होताच मी त्वरित माहिती दिली. सध्या मी सेवानिवृत्त असून विलंबाला मी जबाबदार नसल्यामुळे माझ्यावर कारवाई होऊ नये.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांचे ३ अर्ज होते. आधीच्या अर्जावर नाव, पत्ता नव्हता. तसेच ढोबळ मानाने सविस्तर माहिती मागितलेली होती. माहिती मिळाली नसल्याच्या अपीलकर्त्यांच्या तक्रारीनुसार संबंधितांना समज देण्यात आली व तातडीने कारवाई करण्याची राज्य माहिती आयोगाला शिफारस करण्यात येत असल्याचे निकालपत्रात नमूद केले. मात्र १० दिवसात माहिती देण्याचे आदेश अपिलावर दिले व त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी नेमका कालावधी नमूद न करता ५ वर्षांमधील सरसकट स्वरुपाची माहिती मागितली आहे. स्पष्टीकरण, कारणमीमांसा, अभिप्राय अशा स्वरुपाची विचारणा अनेक मुद्दयांमध्ये असून प्रश्नाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्यांनी कागदपत्रांमध्ये शोध घेऊन संकलित करुन माहिती द्यावी, अशी त्यांची अपेक्षा दिसते. (उदा. वर्षानुवर्षे प्रलंबित राहिलेल्या ऑर्डर प्रकरणी आपल्याकडील सर्व ठरावांची नक्कल देण्यात यावी.) तसेच नियमावलीच्या तरतुदीची व त्या अनुषंगाने कार्यवाही, खुलाशांची, स्पष्टीकरणाची मागणी त्यात आहे. या सर्व बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या संज्ञेत येत नाहीत. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी याचा विचार अपिलाच्या निर्णयात केलेला नाही. सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली नियमावलीसारखे माहिती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तथापि अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले गेलेले नाही व त्याची नेमकी जबाबदारी उभय बाजूंच्या निवेदानातून व कागदपत्रांमधून स्पष्ट होत नाही. अपिलीय प्राधिकारी यानी याबाबतचा नेमका अहवाल सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतरच विलंब आणि त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही याबाबत स्पष्टता होईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता आवश्यक असलेल्या अभिलेखांचे अवलोकन जन माहिती अधिकारी यानी त्याना करु द्यावे व हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क पुरवाव्या.

३. अपीलकर्त्यांच्या माहिती-मागणी अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत चौकशी करुन अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, जि. सांगली श्री. अनिल अ. पाटील यानी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह आयोगाला दि. ३०/८/२०११ पर्यंत अहवाल सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.७.२०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र लक्ष्मण आपटे
मु.पो.टाकळी हाजी, ता.शिरूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी वर्ग-१,
पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी, (सांख्यिकी),
पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी, (सांख्यिकी), पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे श्री.वामन ब्रिजलाल मगरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपण वडवडिलांपासून भूमीहीन असून दारिद्र्यरेषेखालील यादीत नाव यावे अशी मागणी केली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यानी त्यानुसार कार्यवाही केली नाही व त्या यादीत माझे नाव का येऊ शकले नाही याची माहितीही अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रविंद्र लक्ष्मण आपटे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसूनही स्पष्टीकरणासह सर्व माहिती अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतर दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, (सांख्यिकी), पंचायत समिती, शिरूर, ता.शिरूर, जि.पुणे श्री.वामन ब्रिजलाल मगरे यानी केले. ते मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कांताराम तात्याबा काळे
मु.पो.घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पुणे प्रतिनिधी श्री.ए.यू.हजारे

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे विद्यमान-श्री.राहुल शांताराम काळभोर, तत्कालीन-श्री.देविदास द.दरेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पाणीपुरवठा योजनेसाठी वापरलेल्या पीव्हीसी पाईपच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.कांताराम तात्याबा काळे यानी माहिती मागितली होती. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीवर अध्यक्ष व सचिव आम्ही असलो तरी शासनाच्या तांत्रिक मंजुरीशिवाय कोणतेही काम करता येत नाही. योग्य माहिती दिली. परंतु ती मान्य नसल्याचे अपीलकर्ता विविध अर्जांद्वारे नमूद करून सातत्याने तक्रारी करीत असतात. आवश्यक ती ५००० रूपयाची रक्कम भरून इतर नागरिकांनी नळ-जोड घेतला. अपीलकर्त्यानी मात्र अशा प्रकारे तो फुकट मिळविला. सर्व माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.राहुल शांताराम काळभोर व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पुणे प्रतिनिधी श्री.ए.यू.हजारे यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. माहितीबाबत त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**पुणे खंडपीठ**

**पुणे**<br>
**दि :- ३० जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश रामचंद्र रेडेकर
४६०, कवडेनगर, नवी सांगवी, पुणे-४११०२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज विभाग,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०४८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश रामचंद्र रेडेकर
४६०, कवडेनगर, नवी सांगवी, पुणे-४११०२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.टी.व्ही.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज विभाग,
ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.टी.व्ही.पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

७/१२ उताऱ्यावर आवश्यक ती नोंद करण्यात टाळाटाळ करणारे मंडल अधिकारी व तलाठी यांच्यावर केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.प्रकाश रामचंद्र रेडेकर यानी मागितली होती. तसेच त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल का करण्यात येवू नये, अशी विचारणा केली होती. संबंधित मंडल अधिकारी श्री.जयराम सुबराव कडूकर (माजी तलाठी, मनवाड) यानी आवश्यक कामकाजात विलंब केल्याचे आढळून आले असून त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. तसे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर व जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, गडहिंग्लज विभाग, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.टी.व्ही.पाटील यानी केले. अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर यांचे तशाच आशयाचे लेखी निवेदन त्यानी सादर केले. ते लक्षात घेता त्याना माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० जुलै २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.यशवंत नारायण खराडे
५४/५७, गुरूवार पेठ, शितळादेवी चौक, पुणे-४११००४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे-४११००२ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,
९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे-४११००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९६८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,<br>९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे प्रतिनिधी श्री.शेखर रामचंद्र परब<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली,<br>९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे प्रतिनिधी श्री.पी.व्ही.धानेपकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

नवरंग गृहरचना हौसिंग सोसायटी या संस्थेला नोव्हेंबर १९८१ मध्ये जिल्हाधिकाऱ्यानी दिलेल्या बिनशेती आदेशाची प्रत व संस्थेकडून सन २०१० पर्यंत केलेली सारा वसुली याबाबतची

माहिती मागितली होती. बिनशेती सारा वसूल झालेला नाही, म्हणून ही माहिती मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, ९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे श्री.जगदीश निंबाळकर यानी ती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.यशवंत नारायण खराडे यानी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

३० वर्षांच्या काळातील माहिती अपीलकर्त्यांनी मागितली असून लेखा तपासणी झ ाल्यानंतर संबंधित चलने नष्ट केली जातात. त्यामुळे माहिती संकलित करून देण्याच्या सूचना गावकामगार तलाठी याना दिल्या आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, ९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.पी.व्ही.धानेपकर यानी केले.

अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असून अपीलकर्त्यास ती दिली जाणे आवश्यक आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.जगदीश निंबाळकर यानी कार्यवाहीबाबत अर्ज तलाठ्यांकडे वर्ग करण्यापलीकडे अधिक लक्ष घालणे आवश्यक होते, याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती तलाठ्यांकडून प्राप्त करून घेऊन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हवेली, ९३१, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे यानी दि.३०.८.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३० जुलै २०११**